सत्यमेव जयते

# रोजगार हमी योजना समिती

## (२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## चोविसावा अहवाल

(हिंगोली जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक १५ एप्रिल २०१३ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

*

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१३

# रोजगार हमी योजना समिती

## (२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## चोविसावा अहवाल

(हिंगोली जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक १५ एप्रिल २०१३ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

## रोजगार हमी योजना समिती
## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.
(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(४) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.
(५) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(६) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(७) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.
(८) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.
(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.
(१२) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.
(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.
(१४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(१५) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.
(१६) श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स.
(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१८) श्री. संजय राठोड, वि.स.स.
(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(२०) श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
*(२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(२४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.
**(२५) रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव,
(३) श्री. विलास आठवले, उप सचिव,
(४) श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

---

**टीप.—*** श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अनिल तटकरे, वि.प.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर २०१० रोजी मा. सभापतींनी सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

** श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिनांक ७ जानेवारी २०११ रोजी त्यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने अनुक्रमांक २५ वरील पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.

## रोजगार हमी योजना समिती
## (२०१२-२०१३)

**समिती प्रमुख**

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(६) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले, वि.स.स.
(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
***(१२) श्री ए. टी. पवार, वि.स.स.
*(१३) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
*(१४) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
*(१५) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
*(१६) प्रा. अतुल देशकर,वि.स.स.
(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१८) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(२०) श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण वि.प.स.
(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
*(२४) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. भगवान साळुंखे, वि.प.स.
**(२६) डॉ. दिपक सावंत, वि.प.स., **निमंत्रित**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव,
(३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव, (समिती).

---

**टीप :** * डॉ. खुशाल बोपचे, सर्वश्री हरिष पिंपळे, संजय भेगडे व प्रा. अतुल देशकर, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

** डॉ. दिपक सावंत, वि.प.स. यांची दिनांक २७ ऑगस्ट,२०१२ रोजी मा.सभापतीनी निमंत्रित सदस्य म्हणून फेर नामनियुक्ती केली.

*** श्री लक्ष्मण जगताप, वि.स.स. याच्या ऐवजी श्री. ए. टी. पवार,वि.स.स. यांची दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १. | कामाचे वार्षिक नियोजन | १ |
| २. | निधीचा पुरवठा व खर्च | २ |
| ३. | मजुरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च | ३ |
| ४. | मजुरांची नोंदणी | ६ |
| ५. | मजुरीचे वाटप | ६ |
| ६. | अपूर्ण कामे | ९ |
| ७. | गैरव्यवहाराची प्रकरणे | १४ |
| ८. | सामाजिक वनीकरण | १७ |
| | **परिशिष्ट :** | |
| | (एक) अपूर्ण कामे | १९ |
| | (दोन) गैरव्यवहाराची प्रकरणे | ३५ |
| | (तीन) बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ६५ |

## प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना ''समितीचा प्रमुख'' या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा चोविसावा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद, यांनी अनुक्रमे दिनांक ३१ मे २०१२ व १ जून २०१२ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१२-२०१३ या वर्षासाठी समिती गठीत केली. यापूर्वीच्या समितीने दिनांक २१ व २२ ऑक्टोबर,२०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणाऱ्या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

जिल्हा बैठकींमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करून ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल, समितीचे सर्व सदस्य, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, हिंगोली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरून समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे..

समितीने सदर अहवाल दिनांक ८ एप्रिल २०१३ रोजी विचारात घेतला व संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ८ एप्रिल २०१३.

**ॲड. सदाशिवराव पाटील**
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

# रोजगार हमी योजना समितीचा
# अहवाल

## १. कामाचे वार्षिक नियोजन :

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर, २०११ रोजी हिंगोली येथे जिल्हा बैठक घेण्यात आली. बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेत सन २००३-०४, २००४-०५ व २००५-०६ या वर्षांच्या कामाचे वार्षिक नियोजन आराखड्याचे तपशील पुस्तिकेत नमूद केले आहे. परंतु सन २००६-०७ ते २०१०-११ या वर्षातील कामांचे वार्षिक नियोजन आराखडे तपशील देण्यात आले नसून या जिल्ह्यात मग्रारोहयो लागू झाल्यामुळे मग्रारोहयोचे नियोजन तयार करून त्यास जिल्हा परिषद, हिंगोली यांची मान्यता घेण्यात आली आहे असे नमूद केले आहे. सन २००३-२००४ या वर्षात जलसंधारणाच्या कामावर ४७.२७% आणि पाटबंधाऱ्यांच्या कामावर १४.७९% खर्च करण्यात आला. सन २००४-०५ मध्ये जलसंधारणाच्या कामावर ४३.९२% व पाटबंधाऱ्यांच्या कामावर १९.७१% खर्च करण्यात आला. तर सन २००५-०६ मध्ये जलसंधारणाच्या कामावर ५२% आणि पाटबंधाऱ्यांच्या कामावर १३% खर्च करण्यात आला होता. पाटबंधाऱ्यांच्या कामावर ५% आणि जलसंधारणाच्या कामावर ५५% खर्च करावयाचा असताना त्या प्रमाणात खर्च करण्यात आलेला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, जलसंधारण व पाटबंधाऱ्यांवर झालेल्या खर्चाच्या टक्केवारीमध्ये तफावत आहे. अशा पध्दतीचे नियोजन का केले आणि आयुक्त कार्यालयाने त्याला मान्यता कशी दिली. सन २००३-०४ मध्ये आयुक्तांना वार्षिक नियोजनाचे आराखडे सादर केल्याचा दिनांक १८ सप्टेंबर २००३ आहे आणि त्यांच्याकडून मंजुरी मिळाल्याचा दिनांक १८ सप्टेंबर २००३ आहे. ही बाब संशयास्पद आहे. ज्या दिवशी आराखडे सादर झाले त्याच दिवशी मंजुरी कशी मिळाली? खर्चाच्या टक्केवारीमध्ये तफावत दिसते हे पुढील वर्षाचे नियोजन असते व एकाच दिवशी मंजुरी मिळाल्याचे दर्शविण्यात आले आहे ते बरोबर वाटत नाही.

या संदर्भात उप जिल्हाधिकारी, रोहयो यांनी समितीला अशी माहिती दिली की, सन २००३-०४ मध्ये दिनांक १८ सप्टेंबर २००३ रोजी नियोजन आराखडे सादर केले आणि त्याच दिवशी मंजुरी मिळाली आहे. सन २००४-०५ मध्ये दिनांक १३ सप्टेंबर, २००४ रोजी नियोजन आराखडे आयुक्तांकडे पाठविले आणि दिनाक १५ सप्टेंबर २००४ रोजी मंजुरी मिळाली आहे. सन २००६-०७ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना लागू झाल्यामुळे रोहयोचा आराखडा तयार करण्यात आला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, आयुक्तांकडे जे आराखडे सादर केले जातात ते तसेच मंजूर करतात की छाननी करून मंजूर करतात. तसेच शासनाने जलंसधारणाचे ५५%, पाटबंधारे ५%, वनीकरणासाठी १०%, रस्ते व इतर कामासाठी ३०% अशा पद्धतीने टक्केवारी ठरवून दिलेली आहे. स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असल्यास त्यामध्ये आणखी कमी जास्त कामांचा समावेश करण्यात येत असल्याने प्रस्तुत प्रकरणी स्थानिक परिस्थितीनुसार हा बदल केलेला आहे काय? यावर संबंधितानी अशी माहिती दिली की, स्थानिक परिस्थितीनुसार नियोजन केले आहे.

जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने जिल्हा बैठकीच्या वेळी झालेल्या चर्चेतून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विभागीय सचिवांकडे पाठविलेल्या प्रश्नावलीला विभागाने लेखी स्वरूपात दिलेल्या लेखी माहितीनुसार दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यातील विहिरींची व पाणंद रस्त्याच्या कामाचे वार्षिक नियोजन करण्यात आले आहे काय? त्याची सद्यःस्थिती काय आहे? या संदर्भात जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सांगितले की, सन २०११-१२ च्या वार्षिक नियोजनानुसार ३२२४ विहिरींची कामे प्रस्तावित होती. त्यापैकी २५२७ विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्यःस्थितीत ५९५ विहिरींची कामे सुरू आहेत. ग्रामपंचायतीमार्फत मंजूर पाणंद रस्त्यांची संख्या २५८ असून त्यापैकी ६२ कामे सुरू आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर पाणंद रस्त्यांच्या कामांची संख्या ९५ असून त्यापैकी ३६ कामे सुरू आहेत. जिल्ह्यामध्ये सन २०११-१२ या वर्षात एकूण ३५३ कामे मंजूर करण्यात आली. त्यापैकी ९८ कामे सुरू करण्यात आली असून २८ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. समितीच्या दौऱ्याच्या वेळी अशी चर्चा झाली की, सन २००२ ते २००६ पर्यंत एकही विंधन विहिरीचे काम मंजूर झालेले नव्हते. त्यामुळे यापुढे या कामाला प्राधान्य देण्यात यावे त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

सन २०१२-१३ मध्ये १५२८ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली, त्यापैकी ८३४ विहिरींचे काम प्रगतीपथावर आहे, उर्वरित कामांची सद्यःस्थिती काय आहे असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सांगितले की, जवळपास ५४ विंधन विहिरींची कामे पूर्ण झालेली आहेत. बरीच कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५८२३ विहिरींची नियोजन केल्यानंतर १५२८ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यातील ८३४ कामे प्रगतीपथावर आहेत. नियोजनाच्या अनुषंगाने कितीतरी कमी प्रमाणात यश संपादन

केले आहे व याबाबतीत आता नियोजनाची स्थिती काय आहे? जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सांगितले की, विंधन विहिरींचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्याबाबत ६०.४० चे गुणोत्तर लक्षात घेऊन कामांना मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता. सन २०१२-१३ मध्ये प्रस्तावित आराखडा अधिक कामांचा केला असला तरी ती कामे या वर्षी हाती घेण्यात येत आहेत. विहिरींचा कार्यक्रम सर्व जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रकारे यशस्वी झाला किंवा होत आहे असे असताना हिंगोली जिल्ह्याची आकडेवारी लक्षात घेतली तर नियोजनातील १/६ उद्दिष्ट देखील पूर्ण करू शकत नाहीत याची कारणे काय आहेत. तसेच उद्दिष्ट गाठण्यामध्ये काही अडचणी येत असतील तर समितीसमोर त्या मांडाव्यात असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी असे सांगितले की, कामानुसार मागणीचे नियोजन केले जाते. तसेच सन २०१२-१३ या वर्षाचे लेबर बजेट १७ कोटी रुपयांचे असताना ४० कोटी रुपये खर्च झालेला आहे. पाणंद रस्त्यांची कामे जास्त मंजूर करूनही कमी प्रमाणात कामे सुरू झाली आहे. असे समितीने विचारले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी माहिती दिली की, मागील वर्षी २५८ पाणंद रस्त्यांची कामे मंजूर केली होती व त्यापैकी ६२ कामे सुरू आहेत. सन २०१२-१३ मध्ये ११५३ रस्त्यांच्या कामांचा समावेश असून त्यापैकी ८५ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व ३५ कामे प्रगतीपथावर आहेत. पाणंद रस्त्याचे अर्धेकाम लोक सहभागातून करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. हिंगोली हा ५ तालुक्यांचा जिल्हा आहे. त्या तुलनेत एवढी कामे करण्याचा प्रयत्न केला आहे. मंजूर पाणंद रस्त्यांची संख्या २५८ असून ६२ कामे सुरू केली आहेत असे म्हटले आहे त्या २५८ रस्त्यापैकी किती कामे पूर्ण झाली असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यानी सांगितले की, १९० कामे सुरू झालेली नाहीत.

उप आयुक्त (रोहयो), औरंगाबाद यांनी अधिक अशी माहिती दिली की, हिंगोली जिल्ह्याचे लेबर बजेट १२.५० कोटी रुपयांचे होते. ६.९७ लाख मनुष्य दिनाची निर्मिती झाली. १७.८६ कोटी रुपयांचा खर्च केंद्र शासनाने मंजूर केला आहे. कामाच्या मागणीप्रमाणे कामे सुरू केली. जसजसे मजूर येतील त्यानुसार कामे सुरू केली असल्यामुळे आतापर्यंत ११.२५ लाख खर्च मनुष्य दिन निर्मिती झाली. खर्च २५ कोटी इतका झाला असल्यामुळे सुधारित लेबर बजेट तयार केले आहे. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सांगितले की, पाणंद रस्त्यावर २.८४ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. समितीने दौऱ्याच्या वेळी जे मत व्यक्त केले त्यानुसार नियोजन केले, परंतु उद्दिष्टापैकी कमी प्रमाणात कामे सुरू होत आहेत. हा संपूर्ण अकुशल कामावर खर्च झालेला आहे.

जीएसडीएच्या अधिकाऱ्याने दिलेल्या सूचनेनुसार किती विहिरींची कामे हाती घेण्यात आली आहेत. विहिरी मंजूर करण्यासाठी त्यांच्याकडून प्रमाणपत्र लवकर मिळत नाही. म्हणून नियोजन करता आले नाही असे समितीला सांगण्यात आले होते. त्यात फरक पडला आहे काय? असे समितीने विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अशी माहिती दिली की, अहवालानुसार सन २०११-१२ या आर्थिक वर्षात विहिरींच्या कामांचा समावेश वार्षिक नियोजनामध्ये होता त्यापैकी २५२७ विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली व प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामांपैकी ५९५ कामे सद्यःस्थितीत सुरू आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :**

**रोजगार हमी योजनांच्या कामाचे वार्षिक नियोजन विहित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचा रोजगार हमी योजनेच्या कामावर विपरीत परिणाम होतो. सन २००३-०४ चा वार्षिक आराखडा तयार करताना पुरेशी काळजी घेण्यात आली नाही. सन २००६-०७ ते २०१०-११ च्या वार्षिक नियोजन आराखड्यास मंजुरी मिळविताना वार्षिक नियोजनाच्या तत्वानुसार जलसंधारण/ जलसंवर्धन, पाटबंधारे, वनीकरण/सामाजिक वनीकरण, रस्ते व इतर कामे इत्यादीवरील वार्षिक नियोजन करणे आवश्यक असताना प्रस्तुत बाबींवरील या कालावधीत कामांचे वार्षिक नियोजन करण्यात आले नाही. त्यामुळे स्वयंस्पष्ट माहिती समितीला देण्यात आली नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. या संदर्भात जे अधिकारी/कर्मचारी कामात कसूर करीत असतील तर त्यांना फक्त कारणे दाखवा नोटीस देऊन चालणार नाही. तर त्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. अतः जे अधिकारी/कर्मचारी कामाचे वार्षिक नियोजन वेळेत पूर्ण करीत नसतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस असून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करावा.**

**२. निधीचा पुरवठा व खर्च :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील निधीचा पुरवठा व खर्च यासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००३-०४ मध्ये यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली मागणी ३२३.८८ लाख रुपये असून जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे केलेली मागणी ४४७.०८ लाख रुपये आहे. जिल्हाधिकायांनी शासनाकडे मागणी केलेली रक्कम आणि शासनाने मंजूर केलेला निधी ३४१.९८ लाख रुपये आहे. यंत्रणेस प्राप्त झालेला निधी १९९.०८ लाख रुपये असून खर्च करण्यात आलेली रक्कम १९०.६२० लाख रुपये दाखविली आहे. तसेच समर्पित केलेला निधी १५१.३६ लाख रुपये आहे. एवढा निधी समर्पित कसा केला? तसेच २००४-०५, २००५-०६ मध्ये सुद्धा तशीच परिस्थिती आहे. यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली मागणी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे केलेली मागणी यामध्ये तफावत आहे. याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी स्पष्ट केले की, सन २००३-०४ या वर्षी

यंत्रणेने ३२३.८८ लाख रुपयांची मागणी केली होती. तिमाही सुरू होण्यापूर्वी यंत्रणेकडून मागणी घेण्यात येत असते. २० दिवसांपूर्वी माहिती मागविण्यात येते आणि शासनाकडे १५ दिवसापूर्वी मागणी करण्यात येत असते.

सन २००५-०६ मध्ये कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी कुशल बाबीअंतर्गत कंत्राटदाराकडून करून घेतलेल्या कामावर १२.२९ इतका खर्च पुस्तिकेत दाखविला आहे. तसेच त्याच ठिकाणी वरच्या कॉलममध्ये एकूण १.८० इतका खर्च दाखविला आहे. याबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, ल.पा.व बांधकाम, जिल्हा परिषद यांनी सांगितले की, कुशल बाबी अंतर्गत कंत्राटदाराकडून करून घेतलेल्या कामावरील खर्च आहे. यावर समितीने विचारणा केली की, या ठिकाणी संख्या दाखविताना चूक झालेली आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी ही चूक दुरुस्त करून घेतो असे समितीस सांगितले.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनांच्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. जिल्हा बैठकीच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, हिंगोली या यंत्रणेने मजुंराच्या सोयी सवलतीवर ४.३२ टक्के व का.अ.सा.बां विभाग हिंगोली या यंत्रणेने ४.५० टक्के तसेच उप वनसंरक्षक परभणी या यंत्रणेने ४.८० टक्के इतका अधिक खर्च करण्याची कारणे काय या बाबतचा सविस्तर अहवाल साक्ष बैठकीच्या वेळी सादर केला.

यावर समितीने विचारणा केली की, हत्त्यार भाडे व हत्त्याराला धार लावणे यासाठी १.७४ लाख रुपये खर्च केला आहे. हत्त्यारे भाड्याने घेतली जात असताना धार लावण्यासाठी यंत्रणेने खर्च करणे म्हणजे दुप्पट खर्च केला असे वाटत नाही का? मजुरांना भाडे आणि धार लावण्याचा खर्चही देण्यात येतो का? यावर जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, हिंगोली यानी सांगितले की, अवजारे मजुरांची असतात, आपण ही रक्कम फक्त मजुरांना देतो. हत्त्याराचे भाडे म्हणजे टोपले, टिकाव, खोरे मजुरांनी आणायचे असते. धार लावण्यासाठी आपण मजुरांना पैसे देतो. नमुन्यामध्ये मजुरांची सोयी-सवलतीवर कोणत्या बाबींवर खर्च केला हे नमूद करावयाचे होते. त्या खर्चामध्ये या बाबी समाविष्ट केल्या होत्या. सोयी सवलतींवरील खर्चामध्ये हा खर्च का समाविष्ट केला? असे समितीने विचारले असता, उपायुक्त, रोजगार हमी योजना, औरंगाबाद यानी सांगितले की, बुकलेट तयार करीत असताना टक्केवारी वर्कआऊट केल्यानंतर एकूण खर्च विचारात घेतल्यामुळे तो जास्त झालेला होता. हत्यार भाडे व हत्त्यारांना धार लावणे यावरील खर्च टक्केवारीच्या आतमध्ये आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**समितीच्या असे निदर्शनास आले की, विविध यंत्रणांनी प्रत्येक तिमाहीत करावयाच्या कामाचे सुयोग्यरित्या नियोजन केले नव्हते. सन २०१०-०११ मध्ये जिल्ह्याला १५४७ लाख रुपये प्राप्त झाले होते. नियोजन न केल्याने शासनाकडून रक्कम मंजूर झालेली असतानाही ती योग्य प्रकारे खर्च करण्यात आली नाही. यंत्रणांनी केलेल्या कामांचा आढावा घेतला असता सर्व यंत्रणांनी १३३६ लाख रुपये खर्च केले. तसेच निधी प्राप्त होऊन सुद्धा तो पूर्णपणे खर्च केला गेला नाही. जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजना राबविण्याऱ्या विविध यंत्राणांच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसून त्यांना योजना राबविण्यात स्वारस्य नाही असे समितीला प्रकर्षाने वाटते. या संदर्भात भविष्यात प्राप्त होणारा निधी पूर्णपणे खर्च करण्यासाठी योग्य ते नियोजन केले पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे तरी याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली याची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**३. मजुरांच्या सोई सवलतींवर करण्यात आलेला खर्च :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथील जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला देण्यात आलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (राज्यस्तर), परभणी यांनी मजुरांच्या सोई-सवलतींवर १.४४ % खर्च केला. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), नांदेड यांनी १.१९ % इतका खर्च केला. उप वन संरक्षक, परभणी यांनी १.६० % खर्च केला. त्याचप्रमाणे उप संचालक, सामाजिक वनिकरण, परभणी या यंत्रणेने ३.१४% खर्च केला. काही यंत्रणानी १%, दीड टक्के खर्च केला याची कारणे काय आहेत ? सोयीसवलतींवर झालेल्या जास्तीच्या खर्चाच्या कारणांचा जिल्हाधिकाऱ्यांनी एकत्रितरित्या आढावा घ्यावा व समितीला माहिती द्यावी. त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद, लघुसिंचन, हिंगोली, कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत व उप वनसंरक्षक, परभणी या तीन यंत्रणांनी सोयीसुविधांवर खर्च कमी का केला, मजुरांना सोयीसुविधा का पुरविण्यात आली नाही याची समितीला माहिती पुरविण्यात यावी. त्यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर, परभणी यांनी माहिती दिली की, यामध्ये जास्तीतजास्त कामांमध्ये खास बाब म्हणून यंत्राद्वारे नोंद केली आहे. यंत्राद्वारे ते काम केल्यामुळे सोयीसुविधा दिल्या नाही. प्रस्तुत प्रकरणी संबंधितांनी दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने स्पष्ट केले की, समितीसमोर अयोग्य व चुकीची माहिती देणे उचित नाही. मजुरांना विश्रांतीसाठी दोन शेड बांधण्यात आल्या व लहान मुलांना सांभाळण्यासाठी एक मजूर ठेवण्यात आला त्यासाठी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर, परभणी यांनी सांगितले की, अकुशल कामावरील मजुरांना सोयीसुविधा पुरविल्यानंतर काम बंद पडले. निलंबन

निधीबाबत चौकशी केली असता, बरेच दिवस काम बंद राहिल्यामुळे शासनाने खास बाब म्हणून विभागामार्फत हे काम करण्यास परवानगी दिली. अपूर्ण कामे तेवढेच असून त्यावरील खर्च कमी झाला आहे. उप वनसंरक्षक,परभणी यांनी मजुरांच्या सोईसवलतीवर खर्च कसा केला? यावर उप विभागीय वन अधिकारी यांनी माहिती दिली की, मजुरांच्या हत्यार भाडयासाठी ०.५ व पाण्यासाठी ०.२० खर्च झाला आहे असा एकूण २८ हजार रुपये इतका खर्च झाला आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली या यंत्रणेने मजुरांच्या सोईसवलतीवर ४.५०% व अधीक्षक कृषी अधिकारी या यंत्रणेने मजुरांच्या सोईसवलतींवर ४.३२ % खर्च केला आहे. या दोन्ही यंत्रणांनी मजुराच्या सोईसवलतींवर ३% पेक्षा जास्त खर्च करण्याचे कारण काय असे समितीने विचारले असता, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांनी सांगितले की, कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करावी लागते त्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार मजूर लावावे लागतात. काही ठिकाणी अंतर जास्त असल्यामुळे जास्त मजूर लागतात. त्यामुळे थोडा खर्च वाढलेला आहे. सदर खर्च २.७०% अपेक्षित होता. परंतु खर्च जास्त झाला आहे. या संदर्भात समितीने स्पष्ट केले की, नियम बाजूला सारुन पाण्यासाठी मजूर लावण्यात आले होते काय? याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करून साक्षीच्या वेळी समितीला सविस्तर माहिती सादर करावी.

सन २००४-०५ मध्ये उप वन संरक्षक, परभणी यांनी मजूरांच्या सोईसवलतीवर ४.८० लाख रुपये व जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, हिंगोली यांनी ६ लाख रुपये खर्च केला आहे. मजूरांच्या सोईसवलतींवर विहित मर्यादेपेक्षा अधिक रक्कम खर्च होण्याची कारणे काय, सोईसवलतींवर झालेला जास्तीचा खर्च संयुक्तीक वाटत नाही. ज्या यंत्रणेकडून जास्तीचा खर्च झालेला आहे त्याबाबत तपासणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा असे समितीने स्पष्ट केले.

समितीने दिलेल्या वरील निदेशनुसार व प्रश्नावलीच्या माध्यमातून विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.—

**(अ) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंगोली—**

सन २००३-०४ या वर्षात एकूण अकूशल खर्च ७२.९० लक्ष, कुशल खर्च ३.२९ लक्ष झालेला आहे. शासन निर्णय क्र.रोहयो २००३/प्र.३८/रोहयो-६, दिनांक २६ ऑगस्ट २००३ मधील निर्देशानुसार हत्यारभाडे रू ०.९० लक्ष व हत्यारास धार लावणे रु ०.८४ लक्ष असा एकूण रु १.७४ लक्ष वजा जाता निव्वळ सोईसवलतीवर रु.१.५५ लक्ष खर्च झाला असून त्याची टक्केवारी २.१२ टक्के म्हणजेच २.७० टक्केपेक्षा कमी येते. त्यामुळे मजुरांच्या सुखसोईवर झालेला खर्च विहित मर्यादेत आहे.

**(ब) कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, हिंगोली—**

शासन निर्णय क्र.रोहयो -२००३/प्र.३८/रोहयो-६, दिनांक २६ ऑगस्ट २००३ मधील सर्वसाधारण बाब ३ नुसार मजुरांना प्रदान केलेले हत्याराचे भाडे व धार लावणे याबाबी टक्केवारी काढताना न धरण्याबाबत निर्देशीत केलेले आहे त्यानुसार सन २००३-०४ या वर्षात कामावरील करण्यात आलेला अकुशल खर्च रु.२३.५६ लक्ष असून सोई सुविधेवरील एकूण खर्च रु १.०३ दर्शविण्यात आलेला आहे. प्रस्तुत खर्चातून हत्यार भाडे व धार लावणे याबाबीवरील खर्च रु.०.५२ लक्ष वजा केल्यास ०.५१ लक्ष एवढा खर्च मजुरांच्या सोई सवलतीवर करण्यात आला असून तो एकूण खर्चाच्या २.१६ टक्के एवढा येतो. व तो खर्च विहित मर्यादेत आहे.

**(क) उप विभागीय वन अधिकारी—**

उप वनसंरक्षक, परभणी यांच्या मार्फत सन २००४-०५ या वर्षामध्ये रोहयो अंतर्गत अकुशल बाबीवर १२९.८२ लक्ष खर्च करण्यात आला असून मजुरांच्या सुखसोईवर ६.५४ लक्ष खर्च करण्यात आला आहे. एकूण झालेल्या खर्चानुसार मजुरांच्या सुखसोईवरील खर्चाची टक्केवारी ४.८० टक्के इतकी येते. त्याबाबत सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.—

शासन निर्णय क्र. रोहयो-२००३/प्र..३८/रोहयो-६, दिनांक २६ ऑगस्ट २००३ मधील सर्वसाधारण बाब ३ नुसार मजुरांना प्रदान केलेले हत्याराचे भाडे व धार लावणे याबाबीं टक्केवारी काढताना न धरण्याबाबत निर्देशीत केले आहे.त्यामुळे हत्यार भाडे व हत्यारांना धार लावणे या बाबीवरील एकूण खर्च जरी ४.९० टक्के असला तरी हत्यार भाडे व धार लावणे यावरील खर्च वगळल्यास तो ३.०० लक्ष येथो ज्याची टक्केवारी २.२० टक्के येते. त्यामुळे मजुरांच्या सोई सवलतींवर विहित मर्यादेत खर्च झालेला आहे.

तसेच यासंदर्भात जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, हिंगोली यानी सांगितले की, हत्यार भाड्यासाठी ९० हजार रुपये व हत्यारांना धार लावण्यासाठी ८४ हजार रुपये इतका खर्च करण्यात आला आहे. हा खर्च मजुरांच्या सोयी सवलतीमध्ये अंतर्भूत होत नाही, म्हणून ती रक्कम सोयी सवलतीवरील एकूण खर्चातून वगळण्यात आली. शासन निर्णय २६ ऑगस्ट, २००३ नुसार ही रक्कम वजा करण्यात आल्यानंतर झालेल्या खर्चाची टक्केवारी २.१२ इतकी असून ती नियमाप्रमाणे आहे.

यावर समितीने विचारणा केली की, हत्यार भाडे व हत्याराला धार लावणे यासाठी १.७४ लाख रुपये खर्च केला आहे. हत्यारे भाड्याने घेतली जात असताना धार लावण्यासाठी यंत्रणेने खर्च करणे म्हणजे दुप्पट खर्च केला असे वाटत नाही का? मजुरांना भाडे आणि धार लावण्याचा खर्चही देण्यात येतो का? यावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, हिंगोली यानी सांगितले की, अवजारे मजुरांची असतात, आपण ही रक्कम फक्त मजुरांना देतो. हत्याराचे भाडे म्हणजे टोपले, टिकाव, खोरे मजुरांनी आणायचे असते. धार लावण्यासाठीआपण मजुरांना पैसे देतो. नमुन्यामध्ये मजुरांची सोयी सवलतीवर कोणत्या बाबीवर खर्च केला हे नमूद करावयाचे होते. त्या खर्चामध्ये या बाबी समाविष्ट केल्या होत्या. सोयी सवलतींवरील खर्चामध्ये हा खर्च का समाविष्ट केला? असे समितीने विचारले असता, उपायुक्त, रोहयो, औरंगाबाद यानी सांगितले की,बुकलेट तयार करीत असताना टक्केवारी वर्कआऊट केल्यानंतर एकूण खर्च विचारात घेतल्यामुळे तो जास्त झालेला होता. हत्यार भाडे व हत्यारांना धार लावणे यावरील खर्च टक्केवारीच्या आतमध्ये आहे.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) नांदेड, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, लघु सिंचन विभाग हिंगोली व कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत या यंत्रणांनी रोहयो अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना सोयी सुविधा पुरविण्याकरिता खर्च केलेल्या रक्कमेची टक्केवारी कमी असण्याची कारणे काय? त्याबाबत संबंधित यंत्रणांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

**कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग—**

बहुतांश अकुशल कामे सन २००३-०४ पूर्वी झाली असल्यामुळे मजुरांच्या सुखसोईवर झालेला खर्च कमी दिसून येत आहे. २) सन २००३-०४ मध्ये ल.पा.विभाग, परभणी अंतर्गत केवळ दोन कामे सुरू होती (गांगलवाडी गा.त.ता.औंढा ना.सवड गाव तलाव ता.हिंगोली). सन २००३-०४ मध्ये अकुशल कामावर रु १२.७३ लक्ष खर्च झाला असून निकषावर अकुशल कामाच्या ३ टक्के रक्कम रु ०.३८ लक्ष येते. सन २००३-०४ मध्ये मजुरांच्या सुखसोईवर रु ०.३१२ लक्ष खर्च झालेला आहे. व त्याची टक्केवारी २.४५ टक्के येते. व ही आकडेवारी प्रचलित निकष ३ टक्क्याच्या जवळपास आहे. त्यामुळे मजुरांच्या सुखसोईवर झालेला खर्च हा प्रचलीत निकषानुसार असल्याचे दिसून येते.

**कार्यकारी अभियंता स्थानिक स्तर नांदेड—**

सन २००३-०४ या वर्षात स्थानिक स्तर विभाग, नांदेड या यंत्रणेचे केवळ एक काम सुरू होते व सदरील कामावर रु. ४.७०३ लक्ष अकुशल व रु.७.५३० लक्ष एवढा कुशल खर्च करण्यात आला आहे. मजुरांच्या सोई सवलतीवर रु.०.१४७ लक्ष खर्च करण्यात आला असून सोई सवलतीवरील खर्चाची टक्केवारी माहिती पुस्तिका तयार करताना एकूण खर्चावर काढण्यात आलेली आहे. परंतु अकुशल खर्चाच्या प्रमाणात ही टक्केवारी ३.०३ लक्ष एवढी येते. त्यामुळे मजुरांच्या सोईसवलतीवर निकषाप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने विभागाने दिलेल्या आश्वसित माहितीनुसार समितीने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, ल.पा.(राज्यस्तर), परभणी यांनी समितीला माहिती दिली की, सन २००३-०४ मध्ये १२.४३ लक्ष खर्च झाला आहे. त्या वेळी दोन कामे चालू होती. काही कामे विभागामार्फत करण्यात आली. शासनाच्या यांत्रिकी युनिटद्वारे कामे करण्यात आली असल्यामुळे त्यांना सोयी-सुविधा पुरविण्याचा प्रश्न नाही. यावर समितीने विचारले की, यांत्रिकी कामे शासनाच्या संबंधित विभागामार्फत हाती घेण्यात आली असल्याने त्या कामावरील खर्च रोहयो मधून कसा करण्यात आला? कार्यकारी अभियंता, ल.पा.(राज्यस्तर), परभणी यांनी सांगितले की, सदर काम सन १९९४-९५ चे जुने काम होते त्यामुळे त्याला शासनाने परवानगी दिली होती. याबाबत जिल्हाधिकारी यानी माहिती दिली की, हे काम यंत्रणेने केले आहे, त्याकरिता यंत्रणेने परवानगी मागितल्यानंतर ती देण्यात आली आहे.

- **अभिप्राय व शिफारशी :**

**मजुरांच्या सोईसवलतीवर खर्च करताना शासन निर्णयानुसार एकूण खर्चाच्या ३ टक्के इतकी रक्कम खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे. परंतु समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सन २००३-०४ या वर्षात काही यंत्रणांनी मजुराच्या सोईसवलतींवर ३ टक्क्यापेक्षा कमी रक्कम खर्च केली आहे. कामे रोहयोचे असले तरी ते संबंधित विभागामार्फत करण्यात आले असल्यामुळे ते विभागाच्या अंदाज पत्रकामधून केले पाहिजे. संबंधित विभागाच्या अंदाज पत्रकामधून तशाप्रकारे खर्च करता येतो. एखाद्या कामाचे अंदाज पत्रक केल्यानंतर व ते काम रोहयोमधून केल्यानंतर त्यामधील काही भाग विभागामार्फत किंवा यंत्रणेमार्फत करता येत असेल व तो केला असेल तर तो खर्च रोहयोच्या निधीमधून कमी करून दाखविला पाहिजे. जिल्ह्यातील विविध यंत्रणांनी कामाचे योग्य पद्धतीने नियोजन करून कामे सुरू न केल्याने व काही कामे यंत्राद्वारे केल्याने मजुरांना सोईसवलती देण्यात आल्या नाहीत ही बाब गंभीर आहे. रोजगार हमी योजनेमध्ये ही बाब उचित नाही. असे समितीला वाटते. त्यामुळे जिल्ह्यातील विविध यंत्रणांनी रोहयोची कामे हाती घेऊन मजुरांना रोजगार उपलब्ध करून देताना शासन निर्णयानुसार विहित केलेल्या मर्यादेत त्यांना सोईसुविधा पुरविण्याबाबत सर्व यंत्रणांनी योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. अशी समितीची शिफारस आहे.**

## ४. मजुरांची नोंदणी.—

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील माहितीनुसार समितीने विचारणा केली की, सन २००३ ते २००६ पर्यंत नोंदणी केलेल्या मजुरांची संख्या कळमनुरी येथे २८ हजार ७८३ आणि त्यापैकी १२ हजार ९११ मजुरांना ओळखत्र देण्यात आले आहेत. सेनगाव येथे २९ हजार ७८३ मजूर संख्या असतांना १२ हजार ६२१ मजुरांना ओळखपत्र देण्यात आले, वसमतमध्ये १२ हजार ९११ मजुरांची संख्या असताना ९ हजार ६४४ मजुरांना ओळखपत्र देण्यात आले, त्याचप्रमाणे औंढा येथे २४,८९५ मजुरांची संख्या असताना ११ हजार मजुरांना ओळखपत्र देण्यात आले याची कारणे काय? कळमनुरी, सेनगांव, वसमत आणि औंढा तालुक्यामध्ये मजुरांची संख्या अधिक असताना नोंदणी केलेल्या मजुरांना कमी प्रमाणात ओळखपत्र देण्यात आली आहेत याचे कारण काय? त्यावर उप जिल्हाधिकारी, रोहयो यांनी सांगितले की, नोंदणी झालेल्या मजुरांच्या संख्येइतकी ओळखपत्रे छापलेली नव्हती. शासनाच्यावतीने प्रिटींग प्रेसमधून ओळखपत्र प्राप्त झाल्यानंतर तहसीलदारामार्फत त्या विभागाकडे वितरीत करण्यात आले. एकूण १ लाख ६० हजार ९७५ मजूर संख्या असतांना ७० हजार मजुरांची ओळखपत्रे प्राप्त झाल्यानंतर त्यांचे वाटप करण्यात आले.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीमध्ये दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्या वेळी समितीस पुढीलप्रमाणे माहिती सादर करण्यात आली. कळमनुरी, सेनगांव, वसमत व औंढा तालुक्यात रोहयो अंतर्गत मजुरांची नोंदणी हिंगोली जिल्हा निर्मितीच्या पूर्वी झालेली होती. त्यानंतर नव्याने नोंदणी झाली आहे. नोंदणीच्या वेळी छापील ओळखपत्र विहित नमुन्यात उपलब्ध नसल्यामुळे नोंदणीकृत मजुरांना ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात आलेले नव्हते. शासकीय मुद्रणालयातून ओळखपत्र प्राप्त झाल्यानंतर ती ओळखपत्रे तहसीलदारांमार्फत संबंधित मजुरांना वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली. परंतु त्या वेळी प्रत्यक्षात नोंदणी केलेले सर्व मजूर गावात उपलब्ध न झाल्यामुळे जेवढे मजूर उपलब्ध झाले तेवढ्या मजुरांना ओळखपत्र वाटप करण्यात आले त्यामूळे प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या मजुरापेक्षा ओळखपत्र वाटप केलेल्या मजुरांची संख्या कमी आहे.

**● अभिप्राय व शिफारशी :**

**सन २००३ ते २००६ या कालावधीत कळमनुरी, सेनगांव, वसमत व औंढा तालुक्यात नोंदणी केलेल्या मजुरांची संख्या अधिक असतानाही मजुरांना कमी प्रमाणात ओळखपत्र देण्यात आली आहेत. याबाबत समितीला १) जिल्हा निर्मितीच्या पूर्वी नोंदणी झालेली होती. २) नोंदणी केलेले सर्व मजूर गावात उपलब्ध नव्हते ही देण्यात आलेली कारणे संयुक्तिक वाटत नाहीत. रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना ओळखपत्रे आवश्यक असल्याने त्याबाबत संबंधित यंत्रणेने योग्य ती काळजी घेऊन आवश्यक असलेली ओळखपत्रे विहित काल मर्यादेत उपलब्ध करून घेऊन नोंदणी केलेल्या सर्व मजुरांना ओळखपत्रे देण्याची कार्यवाही पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

## ५. मजुरीचे वाटप.—

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील मजुरीचे वाटप या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, मजुरी वाटपामध्ये चार आठवड्यापेक्षा जास्त विलंब लागला आहे. हजेरी पटांची संख्या सन २००३-०४ मध्ये ५६१, सन २००४-०५ मध्ये ८३१ व सन २००५-०६ मध्ये ३७५ होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात मजुरांची उपस्थिती असतांना चार आठवड्यापेक्षा जास्त उशीर होण्याची कारणे काय? शासनाच्या आदेशानुसार कारवाई करण्याच्या बाबतीत प्रकरण निरंक असण्याची कारणे काय आहेत ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यकारी अभियंतामार्फत जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाची मंजुरी घेऊन ते मस्टर पंचायत समितीच्या विस्तार अधिकायाकडे पाठविले जाते. शासनाकडून गट विकास अधिकाऱ्यांमार्फत मजुरीचे वाटप करण्यामध्ये कालापव्यय होतो हे मान्य आहे. मजुरीचे वाटप करण्यासाठी उशीर होत असल्यामुळे शासनाने २५ हजार रुपये अग्रीम रक्कम देण्याची तरतूद केली होती. ती रक्कम या ठिकाणी वापरली गेली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अग्रीम रक्कम या ठिकाणी का वापरण्यात आली नाही ? मजुरीचे वाटप करण्यासाठी चार ते पाच आठवड्यापेक्षा अधिक कालावधी लागतो. या ठिकाणी वितरण पद्धतीमुळे विलंब झाला असे समितीला सांगण्यात आले. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सांगितले की, काही ठिकाणी आवश्यकता पडली तर अग्रीम रक्कम वापरली जाते. तसेच, गरज पडली तर वापरण्याकरिता पैसे शिल्लक असावेत म्हणून ती रक्कम शिल्लक ठेवली जाते.

उप संचालक, सामाजिक वनीकरण यांचेकडील ४ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या ५०२ असून या हजेरीपटांवर मजुरांची संख्या किती आहे. मजुरांना ४ आठवडे विलंबाने मजुरी मिळाल्याने त्यांची उपासमार झाली. मजुरांना मजुरी देण्यामध्ये विलंब का झाला? आणि गैरव्यवहाराच्या प्रकरणात अधिकारी/कर्मचारी सापडले आहेत. ही गोष्ट बरोबर नाही. राज्यात विविध ठिकाणी कामावर मजूर न येण्याची

कारणे मुख्य सचिवांनी शोधून काढली आहेत. वेळेवर मजुरी मिळत नसल्यामुळे मंजूर कामावर येत नाही असे त्यांना आढळून आले आहे. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांचेकडील ५४ हजेरी पटांवरील मजुरांना विलंबाने मजुरी देण्यात आली आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा असे समितीने स्पष्ट केले असता, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे व बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांनी सांगितले की, याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी खुलासा केला आहे. वितरण व्यवस्थेच्या प्रणालीमुळे मजुरी उशीरा देण्यात आली.

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, लघुसिंचन, हिंगोली यांच्याकडील २ हजेरी पटावरील मजुरांना ४ आठवड्यापेक्षा जास्त विलंबाने मजुरीचे वाटप करण्यात आले. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, राज्यस्तर यांचेकडील हजेरीपटांची संख्या ९७ असून यापैकी ८४ हजेरी पटावरील मजुरांना मजुरी मिळण्यास ४ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झाला आहे. मागणीत त्रुटी असल्यामुळे विलंब झाल्याचे सांगण्यात आले आहे. मागणीत त्रुटी राहण्याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे स्थानिक स्तर, परभणी यांनी सांगितले की, मागणी पाठविली होती परंतु, त्यात त्रुटी असल्याने विलंब झाला होता.

समितीने पुढे असे स्पष्ट केले की, रोजगार हमी योजना समितीने राज्यातील इतरही जिल्हयांना भेटी दिल्या आहेत परंतु त्या जिल्ह्यापेक्षा हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मजुरी देण्यास विलंब झाल्याचे समितीस आढळून आले आहे. जवळजवळ ८० टक्यापेक्षा जास्त हजेरी पटांवरील मजुरांना मजुरी देण्यास विलंब झाला आहे. तेव्हा १०० हजेरीपटांपैकी ५० हजेरी पटांमध्ये ४ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेला आहे. अशा हजेरी पटांची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी करावी.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथील जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित माहितीच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी उप संचालक, सामाजिक वनीकरण या यंत्रणेच्या ५०२ हजेरी पटांवरील मजुरांना मजुरी वाटपास चार आठवड्यापेक्षा जास्त विलंब झाल्याने संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुद्ध कोणती कारवाई केली आहे.या प्रश्नावलीतील प्रश्नाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती सादर केली.–

(१) मजुरांना मजुरी विलंबाने वाटप झाल्याचा कालावधी हा २००३-२००४ चा आहे.

(२) सदर कालावधीत हिंगोली जिल्ह्याचा कार्यभार हा त्यावेळी उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी यांचे नियंत्रणात होता. हिंगोली जिल्हा वेगळा अस्तित्वात आल्यावरसुद्धा सन २०१० पर्यंत सामाजिक वनीकरणाचा विभाग अस्तित्वात आलेला नव्हता.

(३) हिंगोली जिल्ह्याचे सामाजिक वनीकरणाचे सर्वकाम परभणी विभागाकडे असल्यामुळे क्षेत्रीय अधिकारी यांना कामाचा निपटारा करण्याचे दृष्टीने विलंब होत होता.

(४) सामाजीक वनीकरण विभागात रोहयो कामावरील हजेरीपट हे त्या क्षेत्रावर काम करणारे रोपवन कोतवाल, सहाय्यक लागवड अधिकारी हे हजेरी घेत असतात व मोजमाप घेऊन हजेरीपत्रकात नोंद करून हजेरीपत्र तयार करून लागवड अधिकारी यांचेकडे सादर करतात त्यास साधारणतः एक आठवडा लागतो.

(५) लागवड अधिकारी /क्षेत्रीय अधिकारी हे त्यांचे स्तरावर सर्व हजेरीपट गोळा करून व पतमर्यादा मागणीपत्र तयार करून विभागीय कार्यालयास सादर करतात. त्यास एक आठवडयाचा कालावधी लागतो.

(६) सर्व क्षेत्रिय तालुक्याचे मागणीपत्र विभागीय कार्यालयात आल्यानंतर विभागीय कार्यालय तालुक्याचे एकत्रित मागणीपत्र तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करतात. त्यास एक आठवडा लागतो.

(७) जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन पतमर्यादा मागणीची तपासणी करून पतमर्यादा मंजूर करून विभागास प्राप्त होण्यास एक आठवडा लागतो.

(८) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर झालेली पतमर्यादा मिळाल्यानंतर धनादेश तयार करून ते संबधित कोषागाराकडे पाठविण्यास चार ते पाच दिवसांचा कालावधी लागतो. संबंधित लागवड अधिकारी हे धनादेश घेऊन तो बँकेत वटवून त्यास कार्यक्षेत्रातील विविध कामांवर मजुरांची मजुरी अदा करतात. कामाची संख्या व कामाची ठिकाणे विखुरली असल्याकारणाने मजुरी प्रदान करण्यासाठी एक आठवडयाचा कालावधी लागतो.

(९) उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांचे अहवालानुसार मजुरी वाटपात हेतु पुरस्सर विलंब झालेला नाही.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, राज्यस्तर व कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जिल्हा परिषद, या यंत्रणेच्या हजेरीपटावरील मजुरांना मजुरी वाटपास चार आठवड्यापेक्षा जास्त विलंब लागल्याची कारणे पुढील प्रमाणे सादर केली :–

**कार्यकारी अभियंता, ल.पा. राज्यस्तर विभाग परभणी.**—सन २००५-०६ या वर्षी ल.पा.विभाग, परभणी या विभागाअंतर्गत एकूण सुरू कामांची संख्या ५० होती. या कामांकरीता वापरण्यात आलेल्या एकूण हजेरी पटांची संख्या ९७ असून त्यापैकी ४ आठवड्यापेक्षा विलंब झालेल्या हजेरी पटांची संख्या ८४ आहे. हजेरीपटांवरील मजुरांना मजुरी वाटपास ४ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झाल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सर्वसाधारण चौकशी केली असता, त्यांनी विलंबाची सर्वसाधारण कारणे खालील प्रमाणे दिली आहेत :—

(१) झालेल्या कामाची मोजमापे घेणे व इतर कामासाठी अल्प मनुष्यबळ होते. उपलब्ध मनुष्यबळातूनच कामे झाली आहेत.

(२) हजेरीपट मंजुरी व इतर कार्यवाहीसाठी विभागीय कार्यालयाकडून (परभणी) मंजुरी घ्यावी लागत असे.

(३) घेण्यात आलेली कामे शेततळयांची असून ही कामे निकषानुसार या यंत्रणेच्या मापदंडाव्यतिरिक्त होती, परंतु तत्कालीन मा.जिल्हाधिकारी यांचे सूचनेनुसार ही कामे अल्पमनुष्यबळ असतानाही हाती घेण्यात आली.

**कार्यकारी अभियंता, जि.प.ल.सिं. हिंगोली.**—पाझर तलाव असोला तर्फे लाख या जुन्या रोहयोच्या अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत शासनाचे निर्देश होते. सदरील निर्देशानुसार हजेरीपट क्र.१२०३, १२०४, १२०५, १२०६ वर मजूर लावून काम पूर्ण करण्यात आले. या हजेरीपटाच्या मजुरीची अदायगी मग्रारोहयो अंतर्गत उपलब्ध निधीतून करावी की राज्य रोहयोच्या निधीतून करावी याबाबत असलेल्या संभ्रमातून मजुरी वाटपास विलंब झाला आहे. राज्य शासनाकडून रोहयोसाठी निधी प्राप्त होताच मजुरी वाटप करण्यात आली. त्यामध्ये हेतूतः कोणत्याही स्तरावर विलंब झालेला नाही.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला देण्यात आलेल्या आश्वासनावरील माहिती पुस्तिकेनुसार समितीने दिनांक १७ ऑक्टोबर २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, उप संचालक, सामाजिक वनीकरण या यंत्रणेच्या ५०२ हजेरी पटांवरील मजुरांना मजुरी वाटपास चार आठवड्यापेक्षा जास्त विलंब झाल्याने संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुद्ध कोणती कारवाई केली आहे? त्यावर उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांनी सांगितले की, सन २००३-२००४ मध्ये २६ कामे होती त्या कामावर ५७५ मजूर होते यामध्ये दोन आठवड्यापेक्षा जास्त १४ मस्टर होते, ३ आठवड्यापेक्षा जास्त ५६ मस्टर होते आणि चार आठवड्यापेक्षा जास्त ५०२ मस्टर होते. त्याठिकाणी जट्रोफाची लागवड करण्यात आली असून कामावरील मजूर बारमाही आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, मजुरांचे पेमेंट एक आठवड्यामध्ये झाले पाहिजे असे समितीला वाटते. याठिकाणी उत्तरामध्ये उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांच्या अहवालानुसार मजुरी वाटपामध्ये चार आठवड्यापेक्षा जास्त विलंब हेतूपुरस्सर झालेला नाही असे म्हटले आहे याबाबत खुलासा करावा. या ठिकाणी सर्व क्षेत्रिय तालुक्याचे मागणी पत्र विभागीय कार्यालयात आल्यानंतर विभागीय कार्यालय तालुक्याचे एकत्रित मागणीपत्र तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करतात असे म्हटले आहे. हजेरी पट सादर करण्यासाठी होत असलेल्या विलंबाबाबत जी कारणे दिली आहेत त्यावरून हा विषय किती गंभीरपणे घेतला आहे हा महत्वाचा मुद्दा आहे. त्यांच्याकडून कागदपत्रे येण्यास विलंब होतो हे निर्दशनास आल्याने चार आठवड्यापेक्षा जास्त विलंब होतो हे कारण दिले. वास्तविक हा कालावधी कमी करण्यासाठी काय केले पाहिजे हे सांगितले पाहिजे होते. त्यावर उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांनी सांगितले की, सन २०१० मध्ये हिंगोलीसाठी उप संचालक, सामाजिक वनीकरण, हे पद कार्यान्वीत नव्हते. हिंगोली जिल्हा वेगळा झाल्यानंतर सुद्धा हिंगोली व परभणी करीता पुर्वीचेच कार्यलय होते. त्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी परभणीला जावे लागत होते. यावर्षी हिंगोलीला स्वतंत्र कार्यालय निर्माण झाल्यामुळे दोन ते तीन आठवडयात पेमेंट करता येते.

समितीने पुढे विचारणा केली की, चार आठवड्यापेक्षा जास्त कालावधी लागत असेल तर त्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत हे जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी त्या संदर्भात केव्हा बैठक घेतली? जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सांगितले की, या अनुषंगाने दर पंधरवड्याला आणि मासिक बैठका पाच ते सहा वेळा घेतल्या आहेत. सन २००३-२००४ मध्ये संपूर्ण परभणी जिल्हा होता त्यानंतर जिल्हयाचं विभाजन झाले त्यावेळी पुरेशा प्रमाणात कर्मचारी वर्ग देण्यात आला नाही. नवीन जिल्हा असताना आज सुद्धा काही विभागाची कार्यालये नांदेड व परभणी येथे आहेत. उप संचालकांनी केलेला खुलासा पुरेसा समाधानकारक नाही तरी सुद्धा भविष्यात याबाबत काळजी घेतली पाहिजे. त्यावर विभागीय सचिव यांनी माहिती दिली की, आज तांत्रिक व प्रशासकीय मान्यता पंचायत समितीच्या स्तरावर होते.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, एका कार्यालयाचे दोन कार्यालये केल्यानंतर शासनाच्या नियमाप्रमाणे दोन आठवड्यामध्ये पेमेंट झाले पाहिजे त्याप्रमाणे कार्यवाही केली काय? त्यावर उप संचालक ,सामाजिक वनीकरण, हिंगोली यांनी समितीला माहिती दिली की, शासनाच्या नियमानुसार दोन आठवड्यात पेमेंट झाले पाहिजे. विभागाच्या स्तरावर प्रशासकीय अधिकारी नाहीत तहसील कार्यालयामधील जिल्हा परिषदेच्या लागवड अधिकाऱ्यांना थेट अधिकार दिले आहेत.

अधिकाऱ्यांचे पद भरले नाही त्यामुळे हजेरी पटांना विलंब होतो ही आपली प्रशासकीय बाब आहे परंतु आठ ते दहा दिवसांत पेमेंट झाले पाहिजे यासाठी जिल्हाधिकारी कोणती व्यवस्था करणार आहेत. असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी समितीला माहिती दिली की, शासनाच्या निकषानुसार मस्टर ट्रॅकर ठेवण्यात आला आहे. तो सर्व मस्टरचा आढावा घेऊन ठराविक मुदतीमध्ये पेमेंट केले पाहिजे जास्तीत जास्त कामे काही जिल्हापरिषद, ग्रामपंचायतीच्या स्तरावर करण्याचा प्रयत्न आहे. आता ऑगस्ट महिन्यापर्यंत पूर्ण केले आहे. पावसाळ्यात मजूर जास्त उपलब्ध नसल्याने मस्टरची संख्या कमी झाली आहे. ऑगस्ट पर्यतचे पेमेंट केले पाहिजे, सप्टेंबर व ऑक्टोबरची परिस्थिती काय आहे याबाबत जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काय प्रयत्न केले अशी समितीने विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली यांनी सांगितले की, १५ दिवसांच्या आत झालेल्या कामाचे मूल्यमापन करून त्याची नोंद एम.बी. रेकॉर्डमध्ये करण्यात येऊन ऑगस्टपर्यंत पेमेंट करण्यात आले आहे.. सप्टेंबर व ऑक्टोबरच्या सहा आठवड्याचे पेमेंट मजुरांना करण्यात आले नाही. एका आठवड्यात मजुरांना पेमेंट दिले पाहिजे असे सांगत असताना आपण ४ आठवड्यापेक्षा जास्त कालावधीचे पेमेंट झाले नाही असे सांगता. पेमेंट लवकर होण्यासाठी काय करता येईल सप्टेंबर महिन्यात मस्टर नव्हते काय, ४ आठवड्यापेक्षा जास्त उशीर केला आहे यामध्ये सुधारणा करण्याऐवजी ४ ते ६ आठवडयाचा विलंब का झाला आहे? रोपवाटीकेच्या कामावर किती मजूर काम करतात? अशी समितीने विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली यांनी सांगितले की, रोपवाटीकेचे काम सुरू होते. त्यामुळे हजेरी पट सुरू होते. ऑगस्टमध्ये मोठ्या प्रमाणात मजूर उपस्थित होते. यासंदर्भात उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांनी सांगितले की, पावसाळ्यात पंधरा ते वीस मजूर असतात. पावसाळा संपल्यानंतर दहा हजार रोपांसाठी एक मजूर ठेवतो. आता एमआरजीएस मध्ये सहा रोपवाटीकांमध्ये ६० मजूर आहेत. त्यामध्ये रोपांना पाणी देण्याचे काम केले जाते. त्याचप्रमाणे रक्षकसाठी एक पद असून त्याला देखील एमआरईजीएसमधून पेमेंट केले जाते.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सुरक्षा रक्षकांना एमआरईजीएस मधून नेमण्यात येऊ नये असे शासनाचे निदेश आहेत. याचे कारण एक वर्षानंतर ते नोकरी मध्ये कायम करण्याबाबत आग्रही राहतात त्यामुळे त्यांना या योजनेमधून पेमेंट देता येईल काय? यासंदर्भात विभागीय सचिव यांनी माहिती दिली की, ही योजना राज्य शासनाची असल्यामुळे नरेगा मध्ये असे कर्मचारी लावण्यात येत नाहीत. त्यावर समितीने या साठ मजुरांना नरेगा योजनेमधून वेतन दिले जात असेल तर ते चुकीचे आहे. या वर्षी किती रोपांची लागवड केली. यावर्षी ६१ हजार रोपे लावण्यात आली. त्यासाठी ६ लाख रुपये खर्च करण्यात आले. त्यासाठी रोजंदारीवर मजूर लावण्यात आले असून ते दिवसभर त्या ठिकाणी राहतात. ते शेतकऱ्यांच्या शेतावर भाडयाने राहतात. त्यांना २४० दिवासांपेक्षा जास्त कालावधीकरीता कामावर ठेवण्यात येत नाही. असी माहिती उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांनी समितीला दिली. सामाजिक वनीकरण विभागाकडून झालेली कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांनी तपासून पहावी असे समितीने स्पष्ट केले असता जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक उत्तर दिले.

● **अभिप्राय व शिफारशी :**

**रोजगार हमी योजनेच्या कामांवर काम करीत असलेल्या मजुरांना मजुरी वेळेवर दिली जाते किंवा कसे याबाबत समितीने माहिती घेतली असता मजुरांना मजुरी मिळण्यास चार आठवड्याचा विलंब झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत समितीच्या प्रत्येक बैठकीत आढावा घेतला जातो व अनेक सूचना करण्यात येतात मात्र समितीला असे आढळून आले की, समितीने केलेल्या सूचनांवर योग्य अंमलबजावणी होत नाही तसेच मजूरांना वेळेत मजुरी मिळत नाही. प्रत्येक जिल्ह्यास मजूरी वेळेत न देण्याची वेगवेगळे कारणे सांगण्यात येतात. ही बाब गंभीर आहे.**

**मजुरी वाटपात होणाऱ्या अनियमिततेबाबत समितीने अनेक अधिकाऱ्यांना शिक्षा करण्याबाबत सुचवूनही मजुरी वाटपात सुधारणा झालेली आढळत नाही यावर समिती तीव्र नाराजी व्यक्त करत असून सचिवांनी याबाबत अधिक लक्ष देऊन शासनाच्या धोरणानुसार दोन आठवड्यात मजुरी मजुराला मिळालीच पाहिजे याबाबत योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

६. अपूर्ण कामे.—

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील अपूर्ण कामांच्या संदर्भात समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, राज्यस्तर यांच्याकडील १६ अपूर्ण कामांच्या संदर्भात समितीला माहिती देण्यात यावी. त्यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर), परभणी यांनी सांगितले की, १० वर्षावरील अपूर्ण कामांमध्ये ८ कामे सुधारित अंदाज पत्रकाअभावी अपूर्ण, ४ कामे प्रगती पथावर व ४ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, १६ कामांची सविस्तर यादी पहाता सुधारित अंदाजपत्रकाअभावी ८ कामे अपूर्ण असून ही कामे कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे व केव्हापासून प्रलंबित आहे? त्यावर कोणती कारवाई केली आहे? यासंदर्भात कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्था.स्तर), परभणी यांनी अशी माहिती दिली की, सुधारित प्रशासकीय मान्यतेची कामे सर्कलना सादर केली आहे. दोन कामे विभागीय स्तरावर आहेत. काही कामांमध्ये भ्रष्टाचार असून निलंबन निधी निश्चित करण्यामध्ये ४ ते ५ वर्षांचा कालावधी गेला आहे. त्यावर समितीने विचारणा केली

की, सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे काम किती दिवसांत पूर्ण करण्यात येईल. १० वर्षे कामे अपूर्ण राहतात हे बरोबर नाही. उर्वरित कामे किती दिवसांत पूर्ण करण्यात येतील तसेच कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (राज्यस्तर), परभणी आणि कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर, नांदेड यांच्याकडील जी कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी अपूर्ण आहेत. त्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे काम पूर्ण करावे. आणि त्याचा अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा. त्याचप्रमाणे माळसेलू पाझर तलावाचे काम अनेक वर्षांपासून अपूर्ण आहे त्याबाबत खुलासा करण्यात यावा.कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे, स्थानिकस्तर, परभणी यांनी सांगितले की, सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे काम या महिन्याअखेर केले जाईल. उर्वरित कामे सहा महिन्यांत पूर्ण केली जातील. सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेऊन सदर योजनेची उर्वरीत कामे माहे डिसेंबर, २०१२ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

अपूर्ण कामे पूर्ण करण्यावर शासनाचा भर आहे. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी यंत्रणेला येत असलेल्या अडचणींचा विचार करून सुधारित शासन निर्णय, निर्गमित करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी शासन निर्णय काढला जात आहे असे असतांना यंत्रणेचे अधिकारी मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. विहिरीच्या कामासाठी मजूर मिळतात तसेच इतरही कामांसाठी मजूर मिळतात परंतु, अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याकरिता मजूर का मिळत नाही ही संशयास्पद बाब आहे. अपूर्ण कामावर पैसे खर्च झालेले आहेत परंतु, त्या कामाचा फायदा लोकांना मिळत नाही. अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या संदर्भात आपण लेखी कबूल केलेले आहे त्याप्रमाणे काम पूर्ण झाले नाही तर त्या यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना व्यक्तिगत जबाबदार धरून शासनामार्फत सक्त व कडक कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे माहे जून, २०१२ पर्यंत जर काम पूर्ण झाले नाही तर या बाबतीत अनुपालन अहवालासाठी खास बैठक घेण्यात येईल व व्यक्तिशः जबाबदार धरून दोषी असलेल्या अधिकाऱ्याविरूध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची सर्व यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी असे समितीने स्पष्ट केले. यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर), परभणी यांनी समितीला सांगितले की, सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेऊन सदर योजनेचे उर्वरित कामे डिसेंबर, २०१२ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी माहिती दिली की, अपूर्ण कामांची संख्या एकूण ३० आहे. त्यापैकी ५ कामे पूर्ण झाली आहेत. उरलेल्या २५ कामांपैकी ७ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत आणि १८ कामे शिल्लक राहिली असून ६ कामे वगळावयाची आहेत. प्रस्तुत माहितीने समितीचे समाधान झाले नाही.

पुढे समितीने विचारणा केली की, उमरदरा, पाझर तलाव, ता.कळमनुरी या कामाच्या संदर्भात निलंबन निधी किती निश्चित केला आहे. याबाबत कार्यकारी अभियंता, स्था.स्तर, परभणी यांनी सांगितले की, ७ लाख ३० हजार रुपये इतका निलंबन निधी निश्चित केला आहे. समितीने पुढे विचारणा केली की, सदर कामात गैरव्यवहार आढळून आल्यामुळे कामाचे अभिलेखे पोलिस यंत्रणेकडे हस्तातरित झाल्यामुळे विलंब झाला का, अभिलेखे पोलिसांकडे कधी हस्तांतरित झाले, सन १९८७ मधील हे काम असून जिल्हाधिकाऱ्यांनी या बाबतीत काही आढावा घेतला आहे का? पोलिसांकडून अभिलेखे परत मिळण्यासाठी काय प्रयत्न केले? याबाबत कार्यकारी अभियंता, ल.पा.स्था.स्तर, परभणी यांनी सांगितले की, याबाबतीत अभिलेखे तपासून माहिती देण्यात येईल.

समितीने पुढे स्पष्ट केले की, सदर प्रकरणात सकृत दर्शनी गैरव्यवहार आढळून आला असे म्हटले आहे. पोलिसांनी कागदपत्रे जप्त केली तरीही आपण सकृतदर्शनी गैरव्यवहार असा उल्लेख केला आहे. दिनांक १४ जानेवारी १९८७ रोजी ८७.३५ लाख रुपयांच्या कामाला तांत्रिक मान्यता दिली आहे. कामावर झालेला खर्च १३.९७ लाख रुपये दाखविला आहे. ५ वेळा सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. पहिल्यांदा दिनांक २१ जानेवारी २००१ रोजी ३२.७७४ लाख रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यानंतर दिनांक ३ ऑगस्ट, २००१ रोजी ३९.३८ लाख रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. माहे जानेवारी, २०११ मध्ये ११३.५० लाख रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. झालेला खर्च १० टक्केच्या आत असेल तर, काम वगळता येईल या दृष्टिकोनातून वाट पाहत आहात काय? एकदा काम वगळले की संपले अशा पद्धतीने काम चाललेले दिसते. अधिकाऱ्यांनी हे काम वगळण्याच्या दृष्टीने जाणून बुजून चालढकल चालविली आहे. जप्त केलेले अभिलेखे पोलीस स्टेशनमध्ये आहेत ते परत मिळविण्याच्या बाबतीत काय प्रयत्न केला यांसदर्भात संबंधीत अधिकारी काही करू शकले नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीस दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्या वेळी प्रश्नावलीतील अपूर्ण कामांच्या संदर्भातील प्रश्नाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :—

(१) गोळेगाव पाझर तलाव ता.औंढा कामाचे सुधारित अंदाजपत्रक नवीन दरसूचीनुसार तयार करून त्यास सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यास आले होते. परंतु, त्रुटी पूर्ततेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रस्तुत अंदाजपत्रक यंत्रणेकडे दिनांक ३० एप्रिल २०१२ रोजी परत केले आहे. यंत्रणास्तरावर त्रुटी पूर्ततेसाठी कार्यवाही प्रगतीत आहे.

झालेले काम—दोन्ही तिरावरील माती काम,

शिल्लक काम—उजव्या तिरावरील अंशत:मातीकाम, कदंरभरणी सांडवाव अश्मपटल.

(२) नर्सी नामदेव गाव तलाव कामाचे सुधारित अंदाजपत्रक नवीन दरसूचीनुसार तयार करून त्यास सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांकडे तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आले होते. परंतु, त्रुटी पुर्ततेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रस्तुत अंदाजपत्रक यंत्रणेकडे दिनांक ३० एप्रिल २०१२ रोजी परत केले आहे. यंत्रणास्तरावर त्रुटी पूर्ततेची कार्यवाही प्रगतीत आहे.

झालेले काम—उजव्या तिरावरील मातीकाम,

शिल्लक कामे—डाव्या तिरावरील मातीकाम, कंदरभरणी, सांडवा व अश्मपटलाचे काम

कार्यकारी अभियंता ल.पा.विभाग, परभणी यांचेकडील सुप्रमा अभावी अपूर्ण कामाची संख्या ८ असून प्रस्तुत कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. कामनिहाय सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

(१) लोहगांव पा.त.ता.जि.हिंगोली- दोन्ही तिरावरील माती काम ५५ टक्के काम पूर्ण व सांडवा अश्मपटल कंदरभरणी व उर्वरित माती काम इत्यादी शिल्लक आहे.अद्यावत दरसूची बदलानुसार तांत्रिक मान्याता प्राप्त सु.प्र.मा. प्रगतीत आहे. काम जून २०१३ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) अमला गा.त.ता.जि.हिंगोली - कामाचे अंशत: मातीकाम झालेले आहे.कामावरिल खर्च १० टक्केच्या आत आहे. प्रस्तुत योजने वरील खर्च १० टक्के पेक्षा कमी असल्यामुळे शासन निर्णय, क्र रोहयो-२०११/प्र.क्र.५३/रोहयो-४, दिनांक १५ सप्टेबर २०११ प्रमाणे वगळण्याचा प्रस्ताव तयार करणे प्रगतीत आहे.

(३) सवड गा.त.क्र.२, ता.जि.हिंगोली- योजेनेवरील १० टक्के पेक्षा कमी खर्च असल्यामुळे शासन निर्णय, क्र.रोहयो-२०११ /प्रक्र.५३/ रोहयो ४, दिनांक १५ सप्टेंबर २०११ प्रमाणे वगळण्याचा प्रस्ताव तयार करणे प्रगतीत आहे.

(४) माळसेलू पा.त.ता.जि.हिंगोली - दोन्ही तिरावरील ४० टक्के मातीकाम पूर्ण झाले आहे. सांडवा अश्मपटल, कंदरभरणी, व उर्वरीत मातीकाम शिल्लक, अद्यावत दरसूचीने तांत्रिक मान्यता प्राप्त सु.प्र.मा.प्रगतीत काम जून २०१३ पर्यंत पुर्ण करावयाचे नियोजित आहे.

(५) शेगांव गा.त.ता.जि.हिंगोली- योजेनेवरील १० टक्के खर्च पेक्षा कमी असल्यामुळे शासन निर्णय, क्र.रोहयो-२०११ /प्रक्र.५३/रोहयो ४, दिनांक १५ सप्टेंबर २०११ प्रमाणे वगळण्याचा प्रस्ताव तयार करणे प्रगतीत आहे.

(६) उमरदरा पा.त.ता. कळमनुरीचे- सुधारित अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस्तरावर मुख्य अभियंता यांना वहनांतर बदल प्रस्तावासह सादर करण्यात आले होते. तथापी, वहनांतर बदल प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयाने मंजूर केलेला आहे. मंजूर वहन अंतराचा अंतर्भाव सुप्रमा मध्ये करून सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव मुख अभियंता जलसंपदा विभाग औरंगाबाद यांना सादर करण्यात आला आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता घेणेबाबत संबंधीत उप विभागीय अधिकारी हे पाठपुरावा करीत आहेत.

(७) म्हैसगव्हाण पा.त.ता.कळमनुरी - चे सुधारित अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस्तरावर मुख्य अभियंता यांना वहनांतर बदल प्रस्तावासह सादर करण्यात आले होते. तथापि, वहनांतर बदल प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयाने मंजूर केलेला आहे. मंजूर वहन अंतराचा अंतर्भाव सुप्रमा मध्ये करून सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना सादर करण्यात आला आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता घेणेबाबत संबंधीत उप विभागीय अधिकारी हे पाठपुरावा करीत आहेत.

(८) पेडगांव पा.त.क्रं-१ -५५ टक्के मातीकाम पूर्ण सांडवा अश्मपटल, कंदरभरणी व उर्वरित मातीकाम शिल्लक , अद्यावत दरसूचीने सुतामा व सुप्रमा प्रगतीत. काम जून, २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच माळसेलू पा.त.ता.जि.हिंगोली या योजनेस दिनांक ३ मार्च १९९४ रोजी रु. ८.०७ लक्ष रुपयास तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. दिनांक ८ मे, १९९४ रोजी तलावाचे काम सुरू होऊन १५ फेब्रुवारी १९९५ रोजी सकृतदर्शनी गैरव्यवहार आढळल्यामुळे काम बंद झाले. १९९५ ते २००५ या कालावधीत निलंबन निधी निश्चितीची कार्यवाही सुरू होती. दिनांक २२ सप्टेंबर, २००५ रोजी सदरील अंदाजपत्रकास रु २४.७७ लक्ष रुपये इतकी सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आली व सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव रु २७.८६ लक्ष जिल्हाधिकारी हिंगोली यांना दिनांक २६ सप्टेंबर, २००५ रोजी सादर करण्यात आला. दिनांक ६ डिसेंबर २००५ रोजी जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांना सु.प्र.मा.साठी प्रस्ताव सादर केला. दरम्यान दरसूची बदलामुळे सदर प्रस्ताव सुधारित करण्यास्तव परत करण्यात आला. त्यानुसार दिनांक १२ सप्टेंबर २००७ रोजी रु.३३.८० लक्ष रक्कमेची सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आली व प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी आयुक्त कार्यालयास दिनांक २७ सप्टेंबर, २००७ रोजी सादर करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २९ नोव्हेंबर, २००७ रोजी सदर प्रस्ताव शासनास सु.प्र.मा. साठी सादर

करण्यात आला. शासनाकडून काही उपस्थित शेरे व त्रुटी पूर्ततेसाठी दिनांक ७ डिसेंबर २००७ रोजी सदर प्रस्ताव परत करण्यात आला. त्यानंतर दरसूची बदलामुळे रु ४८.७० लक्ष सुधारित तांत्रिक मान्यता माहे नोव्हेंबर,२०१० अन्वये घेण्यात आली. तदनंतर दरसूची बदलामुळे दिनांक ५ डिसेंबर २०११ रोजी रु.५१.४५ लक्ष रकमेला सुधारित तात्रिक मान्यता घेऊन सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक ३० जानेवारी २०१२ रोजी सादर करण्यात आला होता परंतु, त्रुटी पुर्ततेस्तव सदरील प्रस्ताव दिनांक २६ एप्रिल २०१२ रोजी परत करण्यात आला आहे. अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे त्रुटी आहेत.—

(१) बाबनिहाय परिमाण व रकमा यांचे बाबतचा एकत्रित तुलनात्मक तक्ता जोडणे.

(२) २४ कलमी तपासणी सूची परिपूर्ण स्वरूपात भरणे.

(३) आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. ९६ दिनांक ३० नोव्हेंबर १९९६ चे प्रपत्र जोडणे.

(४) कार्यकारी अभियंता यांचे प्रकल्प स्थळी भेट दिल्याचे प्रमाणपत्र जोडणे.

(५) आयुक्त कार्यालयाचे दिनांक ५ मार्च २००८ अन्वये दिलेल्या प्रपत्रात माहिती सादर करणे.

प्रस्तावातील त्रुटी पुर्तता यंत्रणास्तरावर प्रगतीत आहे.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीत समितीला देण्यात आलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीला पुरविण्यात आलेल्या आश्वासनावरील माहितीच्या अंनुषंगाने समितीने दिनांक १७ ऑक्टोबर २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्या वेळी समितीने विचारणा केली की, माहितीमध्ये कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिकस्तर), नांदेड यंत्रणेची अपूर्ण कामे व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (राज्यस्तर) या यंत्रणेकडील सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी अपूर्ण असलेली ८ कामांची सद्य:स्थिती देण्यात आली आहे. त्यामध्ये शेरे पूर्तता व त्रुटी पूर्तता यामध्ये कामाची किमंत १०० पटीने वाढली आहे. याची कारणे काय आहेत ? याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर), नांदेड यांनी सांगितले की, गोळेगांव पाझर तलावाच्या कामाचे सुधारित प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या कामाला अद्यापी प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. तांत्रिक मान्यता मिळालेली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, या कामाला केव्हा मान्यता मिळाली?तसेच रोजगार हमी योजनेमध्ये एखाद्या कामाला प्रशासकीय/तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर काम सुरू करीत असताना पहिल्यांदा काय करावे लागते? पहिल्यांदा आढ्यामध्ये खोदाई करावी लागते, चांगला थर लागे पर्यंत खोदाई केली जाते, त्यानंतर माती भरण्यास सुरूवात करण्यात येते, मातीकाम केले म्हणजे काय केले? त्यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर), नांदेड यांनी माहिती दिली की, दिनांक २९ जानेवारी १९९२ रोजी तांत्रिक मान्यता घेण्यात आली त्या वेळी अंदाजित रक्कम ८.६७ लाख होती. आता ५०.७१ लाख एवढे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. आतापर्यंत ८.६७ लाखाचे माती काम झाले आहे. अजुन कंदरभणी करावयाची राहिली आहे.याबाबत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर), नांदेड यांनी सांगितले की, सीओटीचे काम करून माती काम केले. प्रस्तुतबाबींच्या अनुषंगाने संबंधीत अधिकारी समितीस योग्य उत्तर देऊ शकले नसल्याने समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली व अधिकाऱ्यांना रोजगार हमी योजनेच्या कामाचे गांभीर्य दिसून येत नाही असे मत व्यक्त केले.

सन १९९२-१९९३ पासूनचा हा विषय आहे. ८ लाखाच्या पाझर तलावांच्या कामाचे सुधारित कामाचे अंदाजपत्रक ५० लाखावर गेले आहे. दरम्यानच्या काळात हा खर्च कोणत्या बाबींवर खर्च झाला हे अधिकारी सांगु शकत नाही. ही गंभीर बाब आहे. शासनस्तरावर ही बाब गांभीर्याने घेतली गेली पाहिजे. समितीसमोर येऊन अशा पद्धतीने उत्तरे दिली जाणे अतिशय गंभीर आहे. याचा ठपका जिल्हाधिकायांवर ठेवावा लागेल. जिल्हाधिकाऱ्यांनी या अधिकाऱ्यांचे होमवर्क करून घेतले नाही का? खर्च झाला असून त्या खर्चाला अद्यापपर्यंत प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. कामाचे टप्पे समाधानकारकपणे अधिकारी सांगू शकत नसतील तर कामाची काय अवस्था असेल? ही सर्व ८ कामे अशाच प्रकारची आहेत. प्रत्येक कामामध्ये हाच प्रकार झालेला आहे. ७ ते ८ पट किंमत वाढलेली आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता अद्याप मिळालेली नाही. जिल्हाधिकारी यानी सांगितले की, यासंदर्भात त्यांच्यास्तरावर जवळपास ३-४ बैठका घेण्यात आल्या. त्या बैठकांना कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर), नांदेड एकदाही हजर राहिले नव्हते. त्यासंदर्भात त्याना कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल व केलेली करवाई समितीस अवगत करण्यात येईल.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनाक २२ ऑक्टोबर २०११ रोजी ही बाब समितीच्या निर्दशनास आली होती. जिल्हा बैठकीच्या एक वर्षानंतर साक्ष घेत असताना या स्थितीमध्ये किंचितही सुधारणा झालेली नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. या आठही कामाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, एका वर्षाच्याकाळात काहीच बदल घडलेला नाही. संबंधित अधिकाऱ्यांना गांभीर्य असल्याचे दिसून येत नाही. तरी अधीक्षक अभियंता, (स्थानिकस्तर), यांनी समितीला वस्तुस्थिती सांगावी.

अधीक्षक अभियंता, (स्थानिक स्तर), औरंगाबाद यांनी माहिती दिली की, दोन्ही बाजुचे माती काम झालेले आहे. घळभरणी व पिचिंगचे काम शिल्लक आहे. प्रशासकीय मान्यता दिनांक २९/१/१९९२ रोजी मिळाली असून सद्य:स्थितीत कामाची किमंत ५० लाख आहे. घळ भरणीतील माती काम, सांडवा व पिचिंगचे काम बाकी आहे.

सहा लाखाचे काम बावन्न लाख रुपयांवर गेले आहे. एकूण किती खर्च केला असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता म्हणतात आठ लाख रुपये खर्च केला. कोणते काम केले असे विचारले असता, माती काम केले असे उत्तर देण्यात आले. आठ लाख रुपयांचे मातीकाम केले असेल तर प्रस्ताव ५० लाखाचा का दिला? घळभरणी आणि पिचिंगच्या कामाला एवढे रुपये लागतात का? असे समितीने विचारले असता, अधीक्षक अभियंता, (स्थानिक स्तर), औरंगाबाद यांनी सांगितले की, काम वाढल्यामुळे किंमत वाढली आहे. त्यावर विचारणा केली की, तलाव किती मीटर लांबीचा आहे? किती पाणी त्यामध्ये साठते? अधीक्षक अभियंता, (स्थानिक स्तर), औरंगाबाद यानी माहिती दिली की, ३२ मीटर लांब घळभरणीचे काम असून पाझर तलाव असल्यामुळे ६ टीएमसी पाणी साठते. हे काम निकशामध्ये बसते का?

यावर विभागीय सचिवानी सांगितले की, २०१० अखेर या भागातील एकूण किती कामे अपूर्ण आहेत याची माहिती जिल्हाधिकारी व आयुक्त स्तरावर घेण्यात येत आहे. ८० टक्के अडचण मराठवाड्यामध्ये आहे. त्यातही बीड, जालना, उस्मानाबाद, लातूर आणि औरंगाबाद व इतर जिल्ह्यापैकी सोलापूर, सांगली येथे ८० ते ९० टक्के कामे अपूर्ण आहेत. मागील ८-१० वर्षापासून मुख्य अडचण निलंबन निधी, विभागीय चौकशी याकरिता कामे अपूर्ण राहिलेली आहेत. ही कामे सुरू करून पूर्ण करावयाची असल्यास अंदाजपत्रक तयार करताना ते पाच ते सहा पट वाढते. दुष्काळी काळात कामे सुरू केली असतील, कामे करण्याबाबत उत्साह दाखविला गेला असावा. परंतु आता सुधारित अंदाजपत्रक करीत असताना घळभरणीच्या कामासाठी एवढा खर्च येणार नाही. उर्वरित काम ८ ते १० लाख रुपयांमध्ये होईल. जून्या पद्धतीने अंदाजपत्रक तयार केल्यामुळे आकडेवारी अधिक दिसून येते. काही कामांच्या साईट चांगल्या आहेत. भविष्यात अशा साईट उपलब्ध होणार नाहीत.

समितीने पुढे असे मत मांडले की, शासनाचा पैसा वाया गेला आणि कोणालाही फायदा झाला नाही. म्हणून हे त्रैराशिक निर्माण झाले आहे. शासनाच्या वतीने ठोस धोरण निर्माण करण्यात यावे. या संदर्भात सुसूत्रता आणावी लागेल. खर्च केलेल्या निधीचा लोकांना फायदा व्हावा म्हणून शासन स्तरावर नियोजन करावे लागेल तसेच अपूर्ण कामे पूर्ण होत नाहीत तो पर्यत या यंत्रणांना नविन कामे देऊ नयेत. यावर विभागीय सचिव यांनी माहिती दिली की, सन २००८ पर्यंत १०१३५ अपूर्ण कामे होती. त्यापैकी ८ हजार कामांचा निर्णय घेण्यात आला असून २ हजार कामे शिल्लक आहेत. गेल्या २ दोन वर्षात १६० कोटी रुपयांची तरतूद यासाठी केलेली आहे. उर्वरीत दोन ते अडीच हजार कामांबाबत निर्णय घ्यावा लागेल.

त्यावर समितीने स्पष्ट केले की, वगळण्यात आलेली कामे विभागाकडे गेलेली आहेत. त्यासाठी देखील तरतुद करून विभागाने ती कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी विभाग स्तरावर निर्णय झाला तर चांगले होईल. तसेच समितीने एक वर्षापूर्वी हिंगोली दौरा केला होता. साक्षीच्या बैठकीत अधीक्षक अभियंत्यानी कामाची पुरेशी माहिती घेतलेली दिसत नाही. त्यामुळे कारणे दाखवा नोटीस देवून खूलासा मागवावा व कोणती कारवाई केली याचा अहवाल समितीला सादर करावा. याबाबत जिल्हाधिकारी यांनी मान्यता दर्शविली.

समितीने विचारणा केली की, माळसेलु पाझर तलावाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले? कार्यकारी अभियंता ल.पा.(राज्य स्तर), परभणी यानी सांगितले की, सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले आहे. जून महिन्यापर्यंत हा गॉर्ज पूर्ण करून घेत आहोत. समितीने पूढे विचारणा केली की, गॉर्जच्या कामाला ५० लाख रुपयांची आवश्यकता आहे का? कार्यकारी अभियंता ल.पा.(राज्य स्तर), परभणी यानी सांगितले की, सुधारित प्रशासकीय मान्यता पूर्ण डॅमची आहे. गॉर्ज फिलिंग व पिचिंग या उर्वरित कामाला जो खर्च लागणार आहे त्याचा प्रस्ताव वेगळा तयार केला जातो.

समितीने विचारणा केली की, रोजगार हमी योजनेची कामे म्हणजे प्रत्येक कामाचा एक इतिहास आहे. रुटीन पद्धतीने आणि सॉफ्टपणे कामे व्हायला पाहिजेत. १९९४ च्या कामाला ८ लाख रुपये निधी मंजूर झाला. आणि कामही सुरू झाले. १९९५ मध्ये सकृतदर्शनी गैरव्यवहार झाल्याचे दिसून आल्यामुळे गैरव्यवहार निश्चित करण्यासाठी तीन-चार वर्षाचा कालावधी उलटून गेला. २४ लाख रुपये खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक २००५ मध्ये देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांकडून २००७ मध्ये ३४.८० लाख रुपये खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. काम सुरू होण्याऐवजी त्रुटी आणि शेरे पूर्तता करण्यामध्ये २०१० साल उजाडले. पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे सुधारित अंदाजपत्रक सादर केले गेले. त्याला अद्याप मान्यता मिळालेली नाही. एका कामाचे प्रकरण म्हणजे इतिहास आहे. हे समाधानकारक नाही. जो गैरव्यवहार झाला त्या संदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांचे काय झाले? याबाबत उपायुक्त, रोहयो यानी सांगितले की, विभागीय चौकशीचा अहवाल दिनांक ९ फेब्रुवारी, २०१२ रोजी सादर केला आहे. शासनाने त्याबाबत परत त्रुटी काढली होती. पुन्हा तपासणी करून अहवाल सादर केला आहे. समितीने विचारणा केली की, यातून आपण काय मतितार्थ घेणार आहोत? विभागीय सचिव यानी सांगितले की, अपूर्ण कामे आणि विभागीय चौकशी हे दोन गंभीर विषय आहेत. वर्ग-१ आणि वर्ग-२ चे अधिकारी अपचारी असल्यास संयुक्त चौकशी करणे, जबाबदारी निश्चित करणे महत्वाचे ठरते. उपायुक्त,रोहयो यानी सांगितले की, शासनाने १८.७.२०१२ रोजी ज्ञापन काढले असून रक्कम वसूल करण्याची नोटीस काढली आहे व त्याची अंमलबजावणी केली आहे.

समितीने स्पष्ट केले की, याबाबत काय कारवाई केली ते पुढील टप्प्यात समितीच्या निदर्शनास आणावे.

• अभिप्राय व शिफारशी :

समितीच्या असे निदर्शनास आले की, कार्यकारी अभियंता, जि.प, लघुसिंचन, हिंगोली या यंत्रणेची दहा वर्षातील तीन कामे अपूर्ण असून त्यापैकी दोन कामे इतर कारणांमुळे अपूर्ण असून एक काम भौतिकदृष्टया पूर्ण आहे. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, (राज्यस्तर), परभणी या यंत्रणेची १० वर्षावरील १६ अपूर्ण कामे असून ८ कामे सुधारित अंदाजपत्रकाअभावी अपूर्ण, ४ कामे प्रगतीपथावर व ४ कामे भौतिकदृष्टया पूर्ण आहे. अपूर्ण कामांचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव विविध स्तरावर दिर्घकालावधीसाठी प्रलंबित असून त्याबाबत संबंधित यंत्रणा व अधिकारी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे समितीच्या निदर्शनास येते.

जिल्ह्यात बरीच कामे प्रदीर्घ कालावधीपासुन अपूर्ण अवस्थेत असून यासंबंधित यंत्रणा व अधिकारी यांनी ही कामे पुर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने सत्वर निर्णय घेऊन त्वरीत कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

अपूर्ण कामावर शासनाचा निधी खर्च झालेला असून अशा अपूर्ण कामाच्या बाबतीत त्वरीत निर्णय घेऊन ती कामे सुरू करून पुर्णत्वास नेणे महत्वाचे आहे अन्यथा शासनाचा खर्च झालेल्या निधीचा अपव्यय होत आहे. याबाबत संबधित यंत्रणा जबाबदार असल्याचे समितीचे मत आहे. अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. व या संदर्भात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा. अशी समितीची शिफारस आहे.

दिनांक २९ जानेवारी, १९९२ रोजी तांत्रिक मान्यता मिळालेले व दिनांक २९ एप्रिल, १९९२ रोजी काम सुरू झालेल्या या जिल्ह्यातील गोळेगांव पाझर तलावाचे काम दिनाक २८ फेब्रुवारी, २००३ रोजी बंद झाले. माळसेलू पाझर तलाव, हिंगोली यास सन १९९४ रोजी रु ८.०० लाख मंजूर करून काम सुरू करण्यात आले सदर कामाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी तसेच त्रुटी आणि शेरे पुर्ततेसाठी सन २०१२ अखेर पर्यंत पूर्ण झालेले नसून अद्याप हे काम अपूर्ण अवस्थेत असून ते सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रतिक्षेत आहे. या तलावाच्या सुधारित मान्यतेचे प्रस्ताव विविध स्तरावर प्रलंबित असून या बाबतीत कोणतेही यंत्रणा/ अधिकारी गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येते. ही बाब अत्यंत गंभीर असून पाणी साठविण्याकडे संबंधिताना स्वारस्य नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. या कामाशी सर्व संबंधितांवर कठोर कारवाई करून केलेल्या कारवाईबाबत समितीला तीन महिन्यात अवगत करावे अशी समिती शिफारस करीत आहे.

७. गैरव्यवहाराची प्रकरणे.—

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर, २०११ रोजी हिंगोली येथे घेण्यात आलेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील गैरव्यवहाराची प्रकरणे या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, हिंगोली नरसी सेनगांव रस्ता रुंदीकरण या कामाच्या संदर्भातील प्रकरण शासन स्तरावर निर्णयास्तव असल्याचे म्हटले असल्याने प्रस्तुत प्रकरण शासनाकडे केव्हा सादर केले. हे प्रकरण किती दिवसांत निकाली काढणार ? अंजनवाडा गांवतळे ता.औंढा या कामांवरील गैरव्यवहाराच्या बाबतीत काय परिस्थिती आहे त्यावर विभागीय अधिकारी यांनी माहिती दिली की, हे प्रकरण एका महिन्यात निकाली काढण्यात येईल. शासन स्तरावर एकूण ४ प्रकरणे प्रलंबित आहेत. ही चारही प्रकरणे २-३ महिन्यात पूर्ण करण्यात येतील. त्यावर समितीने पुढे विचारणा केली की, गोंदनखेडा पाझर तलाव व केंद्रा गांव तलाव ता.सेनगांव याकामावर झालेल्या गैरव्यवहाराच्या बाबतीतील प्रकरणाच्या संदर्भात अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक माहितीसाठी अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ नांदेड यांच्या स्तरावर प्रलंबित आहे असे म्हटले आहे. यामध्ये ८.३४ लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे याबाबत खुलासा करण्यात यावा. उपायुक्त (रोहयो) यांनी माहिती दिली की, प्रस्तुत प्रकरण शासनाकडे सन २००५ मध्ये सादर केले होते. शासनाने दि.२४/५/२०१० च्या पत्रान्वये संयुक्त मोजणी तसेच अतिप्रदानाच्या वसुलीच्या अनुषंगाने विचारणा केली होती. त्या संदर्भात अधीक्षक अभियंता यांच्याकडुन प्राप्त झालेली माहिती शासनास दि.२७/७/२०१० च्या पत्रान्वये सादर केलेली आहे. श्री. एच.एन.लक्ष्मीकांत यांना सेवा उपदान व अंशदान राशी मिळुन जी तीन लाख ९२ हजार रुपये रक्कम प्रदान करावयाची होती ती रोखुन धरलेली आहे. त्यांना देय असलेल्या रक्कमेपेक्षा वसुल करावयाची रक्कम जास्त असल्यामुळे ती रक्कम त्यांच्याकडून कशी वसुल करावी याबाबत अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ नांदेड यांच्याकडे दि.२९/९/२०११ रोजी केली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, शासन स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित आहेत याची कारणे काय आहेत? यावर विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, शासनाकडे प्रकरण आल्यानंतर त्यामध्ये त्रुटी काढुन ते परत पाठविण्यात येते. त्यामुळे प्रकरणे प्रलंबित राहतात.

सन २००५ पासुन सन २०१० पर्यंत ही प्रकरणे का प्रलंबित ठेवली ? गोझरखेड सेनगांवाचे प्रकरण शासन स्तरावर गेल्या ४-५ वर्षापासुन प्रलंबित ठेवण्यात आल्याचे आढळून आले आहे. यासंदर्भात शासनाने या प्रकरणासाठी चार वर्ष विलंब का लावला ? यासंदर्भात शासनाकडुन साक्षीच्या वेळी सविस्तर उत्तर देण्यात यावे. शासन स्तरावर विलंब झाला असेल तर, मंत्रालयीन अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस करण्यात

येईल. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ नांदेड यांच्याकडुन समितीला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. यासाठी काय प्रयत्न केले ? याबाबत उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, काही बाबी संदर्भात विशिष्ट माहिती मागविली असल्यामूळे त्याकरीता प्रकरण शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यावर समितीने विचारले की, एखादा अधिकारी निवृत्त होऊन चार वर्ष झाल्यानंतर देखील त्यांच्यावर कारवाई करता येते असा सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करता येईल. जर दोन आठवड्यात माहिती सादर केली नाही तर समितीच्या साक्षीच्या वेळी याबाबत विचारणा करण्यात येईल. तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.भगत यांची विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्यांचे नाव का वगळले याबाबत खुलासा करावा त्यावर विभागीय अधिकारी यांनी माहिती दिली की, याबाबत सविस्तर माहिती आता उपलब्ध नाही. कोणत्या कारणास्तव त्यांचे नाव वगळण्यात आले? त्या आदेशाची प्रत त्यांच्याकडे नसून ती प्राप्त होताच उपलब्ध करून देण्यात येईल.

या संदर्भात समितीने स्पष्ट केले की, एकाच प्रकरणामध्ये त्यांना वगळले असते तर, समजणे शक्य होते तथापी, त्यांना अनेक प्रकरणामध्ये वगळले आहे याचे कारण काय आहे याबाबतचा मुद्दा समितीच्या साक्षीच्या वेळी स्पष्ट करण्यात यावा.

समितीने विचारणा केली की, श्री.निमोदिया यांच्या बाबतीत अंतिम निर्णयासाठी शासनस्तरावर कार्यवाही प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत? त्यांचे शिक्षेबाबत अंतिम निर्णय शासनाकडुन प्राप्त होणे बाकी आहे म्हणून हे प्रकरण शासन स्तरावर प्रलंबित आहे. असे म्हटले असल्याने या प्रकरणावर  किती दिवसांत कारवाई करण्यात येणार आहे. यावर विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, त्यांच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरण असल्यामुळे शासन स्तरावर कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणाची पुढील माहिती सद्य :स्थितीत उपलब्ध नसल्याने प्रकरण तपासून पाहून तीन महिन्यात कारवाई केली जाईल.

आयुक्त स्तरावर किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर प्रकरणे प्रलंबित राहिल्यानंतर त्याबाबतचे आदेश मंत्रालयीन स्तरावर घेतले जातात. परंतु मंत्रालयीन स्तरावर या प्रकरणा संबंधित लवकर निर्णय लागत नाही. अशा प्रकाराच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणांबाबत प्रधान सचिव (रोहयो) यांची समिती मार्फत साक्ष घेतील जाईल. त्याचबरोबर मंत्रालयीन पातळीवरील प्रलंबित असलेल्या कारवाईच्या संदर्भात समितीला माहिती उपलब्ध व्हावी याकरीता संबंधित रोजगार हमी योजना विभागाच्या उप सचिवांनी देखील समितीच्या दौऱ्यामध्ये होणाऱ्या बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक आहे असे समितीने निदेश दिले.

गांगलवाडी गांवतळे, ता.औंढा येथील प्रकरण सन १९९६ पासून शासनस्तरावर प्रलंबित का आहे ? याबाबत विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी प्रस्तुत प्रकरणावर शासन स्तरावरील कारवाई पूर्ण झाली आहे. समितीने पुढे विचारले की, याबाबतीत संबंधीताना कळविण्यात आले आहे काय? त्यावर विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात आले आहे. तथापी उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, मंत्रालयीन पातळीवर देण्यात आलेले आदेश आमच्याकडे अप्राप्त आहेत. शासनाने शासन निर्णय ई मेल करून पाठविला आहे काय? विभागीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, याबाबत शासनाने निर्णय घेतला असून त्यासंदर्भातील शासन निर्णय ई मेल केला किंवा नाही याबाबत माहिती घेऊन सांगण्यात येईल.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व  २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली  येथे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीतील प्रश्नाच्या अनुषंगाने विभागाने पुढील प्रमाणे माहिती सादर केली. सदर माहितीच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, उमरदरा पाझर तलाव ता. कळमनूरी कामाच्या संदर्भात गैरव्यवहार आढळून आल्याने संबधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली? तसेच पोलीसानी जप्त केलेले अभिलेखे परत मिळवून काम पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली.

उमरदरा पाझर तलाव गैरव्यवहार प्रकरणात श्री. एस. ओ. परदेशी, कार्यकारी अभियंता, श्री. एस. आर. हळदेकर, शाखा अभियंता व श्री.एस.एन.कोठारी, शाखा अभियंता हे अपचारी अधिकारी/कर्मचारी असून सदर प्रकरणी शासनाचे सुचनेनुसार दिनांक २५/४/२०१२ रोजी चौकशी अधिकारी यांचे निष्कर्षावर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचा अभिप्राय व अपचारीक यांचे अभिवेदनावरील अभिप्राय कागदपत्रासहित सादर करण्यात आले आहेत. तसेच कार्यकारी अभियंता, ल.पा. राज्यस्तर विभाग, परभणी यांच्याकडुन त्याचे पत्र दिनांक १०/१०/२०१२ अन्वये संबंधित तीनही अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा तपशील प्राप्त झाला असून जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली मार्फत सदरील सेवा तपशील शासनास सादर करण्यात आला आहे.

प्रस्तुत कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आवश्यक असलेले अभिलेखे पोलिस स्टेशन मधुन उपलब्ध करून घेऊन कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. प्रस्तुत सुधारित अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस्तव मुख्य अभियंता यांनी सांगितले की प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली असून सदरील अंदाजपत्रक मंडळ कार्यालयामार्फत प्रादेशिक विभाग कार्यालयास तांत्रिक मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त होताच अंदाजपत्रक सुधारित प्रशासकीय मान्यतेस्तव नियमानुसार कार्यवाही करून काम जून, २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

उमरदरा पाझर तलाव ता. कळमनूरी कामाच्या गैरव्यवहार प्रकरणाचे पोलिसांनी जप्त केलेले अभिलेखे परत मिळवून काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली? असे समितीने विचारले असता, विभागीय अधिकाऱ्यानी सांगितले की, दिनांक २९.९.२०१२ रोजी शासनाला अहवाल प्राप्त झाला आहे. विभागीय स्तरावर अंतिम निर्णय घ्यावयाचा आहे. सामान्य प्रशासन विभागाला प्रस्ताव पाठविण्यात येईल.अपचारी अधिकारी श्री.एस.ओ.परदेशी, कार्यकारी अभियंता यांच्याकडून १.९५ लाख रुपये, श्री.एस.एन.कोठारी, शाखा अभियंता यांच्याकडून ३८०००, श्री.एस.आर.हळदेकर, शाखा अभियंता यांच्याकडून २०००० रुपये वसूल करावयाचे आहेत. श्री. कोठारी यांचे ६ टक्के निवृत्तीवेतन एक वर्षासाठी, श्री.हळदेकर यांची पुढील वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले आहे. शासन आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानंतर अंतिम आदेश निर्गमित केले जातील.साधारणपणे महिनाअखेर निर्णय होईल

कार्यकारी अधिकारी लघुपाटबंधारे विभाग (राज्यस्तर) परभणी अंतर्गत असलेल्या पाझर तलावांच्या व गांव तलावांच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्या संदर्भात समितीने विचारले असता, मस्टर मध्ये गैरव्यवहार झाला असून शासन स्तरावर कारवाई चालु असल्याची चुकीची माहिती दिली असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर समितीने दिलेल्या निर्देशानुसार कोणती कारवाई करण्यात आली? यावर विभागाने अशी माहिती दिली की, कार्यकारी अभियंता लपा (राज्यस्तर) परभणी यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा घेण्यात आला. सदरील बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, मस्टर मध्ये गैरव्यवहार झाला असे म्हटल्याचा त्याचा उद्देश नव्हता.परंतु अनवधानाने तसा उल्लेख झालेला आहे. तथापि, तलावाच्या कामाच्या परिमाण नोंदणीमध्ये तफावत असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सादर केले आहे. तसेच बैठकीतील अनुसूचनेनुसार कार्यवाहीबाबत समितीचे निर्देश पुढील कार्यवाहीस्तव मा.प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांना जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोलीचे पत्र दिनांक १५ मे २०१२ अन्वये सादर करण्यात आले आहेत. तसेच त्यांचा खुलासा मागविलेला असून तो शासनाकडे सादर केला आहे.

हिंगोली नरसी सेनगांव रस्ता रुंदीकरण कामाच्या गैरव्यवहाराचे शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला असे विचारले असता, प्रस्तुत चौकशी प्रकरणात दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ च्या शासन आदेशान्वये अंतिम आदेश पारीत करण्यात आले आहे असा खुलासा केला आहे.

औढा तालुक्यातील अंजनवाडा गावं तळयाचे कामात गैरव्यवहार झाल्याबाबतचे प्रकरण शासनस्तरावर प्रलंबित असण्याचे कारणे काय? असे विचारले असता, प्रस्तुत चौकशी प्रकरणात.शासन आदेशान्वये अंतिम आदेश पारीत करण्यात आले आहे असा खुलासा केला आहे.

गोंधनखेडा पाझर तलाव व केंद्र गाव तलाव तालुका सेनगांव या कामावर झालेल्या गैरव्यवहाराबाबत अद्याप चौकशी प्रलंबित असण्याची कारणे काय? असे विचारले असता, प्रस्तुत चौकशी प्रकरणात शासनाकडून दिनांक ११ जुलै २०१२ च्या ज्ञापनाद्वारे दुसरी कारणे दाखवा. नोटीस संबधित अपचारी अधिकारी /कर्मचारी यांना देण्यात आली असून जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दिनांक १ ऑक्टोबर २०१२ अन्वये सदरील ज्ञापनाच्या प्रती अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे, नांदेड यांना तामीलीस्तव पाठविण्यात आलेल्या आहे. त्यामध्ये सदरील ज्ञापनावर संबंधित अपचारी अधिकारी/कर्मचारी यांचे अभिवेदन प्राप्त घेवुन शासनास सादर करण्यास्तव सुचित करण्यात आले आहे असा खुलासा केला आहे.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी उपरोक्त प्रकरणी समितीने विचारले कीं, वरील तीनही प्रकरणांचे एकाच विषयाचे प्रश्न आहेत. हिंगोली नरसी, सेनगांव रस्ता रुंदीकरण कामाच्या गैरव्यवहाराचे शासनस्तरावर प्रलंबित असलेली कामे कोणती त्यांवर कोणता निर्णय घेण्यात आला. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, त्याबाबत शासनाने अंतिम आदेश निर्गमित केले आहेत. औढा तालुक्यातील अंजनवाडा गांव तळयाच्या प्रकरणात शासनाने आदेश निर्गमित करून हिंगोली नरसी सेनगांव रस्ता रुंदीकरण प्रकरणामध्ये ठपका ठेवला आहे. त्या ठिकाणी प्राथमिक स्वरूपाची कामे करण्यात आली होती. त्यामध्ये गैरव्यवहाराची रक्कम निरंक होती. त्याचप्रमाणे अंजनवाडी गांव तळयाच्या प्रकरणामध्ये संबंधितांना दोषमुक्त करण्यात आले आहे. त्यासंबंधी दिनांक ७ फेब्रुवारी २०१२ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले. गोंधनखेडा पाझर तलाव प्रकरणामध्ये ४ लाख २६ हजार ५५३ आणि २ लाख १३ हजार ७७७ इतक्या रक्कमेचे वसुलीचे आदेश काढले आहेत.

श्री. निमोदिया यांच्या शिक्षेबाबत शासनस्तरावर अंतिम निर्णय होणे प्रलंबित असण्याची कारणे काय? असे विचारले असता, श्री.निमोदिया तत्कालीन उप विभागीय अभियंता यांचे जडगाव गा.त.व.गा.२ चे संदर्भातील चौकशीचा अहवाल शासनास दिनांक ८ फेब्रुवारी २००६ रोजी प्राप्त झालेला होता. त्यानंतर शासनाचे त्यांना दिनांक २१ जून २०१० रोजी शिक्षेची नोटीस तामील केली होती. तद्नंतर शासनाने दिनांक १४ फेब्रुवारी २०१२ रोजी अंतीम आदेश पारीत केले आहेत. परंतु महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे प्रकरण असल्यामुळे प्रकरणात निर्णय घेणे शासनास शक्य झाले नाही असा खुलासा केला आहे.

बसमत तालुक्यातील राजवाडी पाझर तलावाच्या माती कामामध्ये सन १९९७ मध्ये झालेल्या गैरव्यवहाराचे शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणावर अद्याप निर्णय न घेण्याची कारणे काय आहे? असे विचारले असता, मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु.७.१६ लक्ष दिनांक २९ डिसेंबर, १९९० व सुधारित प्रशासकीय किंमत रु.२७.४४ लक्ष दिनांक ३० जून, २०११ व निलंबन निधी रु.२.९० लक्ष आहे. सुधारित

प्रशासकीय मान्यतेच्या आतच काम पूर्ण झाले असून सदर तलावात पाणी साठा झाला आहे. प्रस्तुत प्रकरणात दिनांक ८ डिसेंबर, २०११ रोजी शिक्षेसाठी सर्व प्रकरण कागदपत्रासह सादर केलेले होते. चौकशी अधिकारी यांचे अभिप्राय विभागीय आयुक्त हे असहमत असल्यामुळे त्याबाबत शिस्तभंग विषयक प्राधिकारी याचे असहमतीचे विवरण पत्र श्री.एस ओ परदेसी, का.अ. श्री.यु.व्हि.पडगीलवार, तत्कालीन उप विभागीय अभियंता, श्री. ए.एम रायकर, तत्कालीन उप विभागीय अभियंता व श्री. इ.टी.राजगुरु, तत्कालीन शाखा अभियंता यांना तामीलसाठी पाठविलेले होते. शासनाचे दिनांक ११ जानेवारी, २०१२ चे पत्रानुसार अपचाऱ्यावर ठेवलेले दोषारोप, चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष , शिस्तभंग विषयक प्राधिकरणाच्या असहमतीचे विवरण पत्राच्या अनुषंगाने अपचारी अभिवेदनाद्वारे उपस्थित केलेला मुद्दा /बचाव व त्यानुषंगाने शिस्तभंग विषयक प्राधिकरणचे अंतिम स्वयंस्पष्ट अभिप्राय याबाबतची अपचारी निहाय दोषारोप सिध्दतेबाबत स्वंतत्र विवरणपत्रे /तुलनात्मक तक्ते, अपचारी श्री. परदेशी, रायकर यांनी चौकशी अहवाल मिळाल्याची पोच अथवा त्यांचे अभिवेदने ही माहिती मागविली होती. विभागीय आयुक्त कार्यालयाचे पत्र दिनाक १४ मे, २०१२ अन्वये श्री.रायकर यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१० चे पत्र तामीलीबाबत गोषवारा सादर करण्यास्तव कळविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दिनांक २७ मे, २०१२ अन्वये श्री.रायकर यांचेवर सदरील पत्र तामीलस्तव पाठविण्यात आले असून कार्यकारी अभियंता, ल.पा.,राज्यस्तर विभाग, परभणी यांचेकडून तामील गोषवारा अप्राप्त आहे. परंतु त्यांनी त्यांचे पत्र दिनांक २१ जून, २०१२ अन्वये श्री.रायकर यांची नोटीस मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय यांचे मार्फत देण्यास्तव नोंदणीकृत डाकेने पत्र क्र ६०४/सप, दिनांक १५ मार्च २०११ अन्वये पाठविल्याबाबत रजिस्ट्री पावतीची प्रत सादर केली आहे. परंतु तामीली प्रत सादर केलेली नाही असा खुलासा केला आहे.

साक्षीच्या बैठकीच्या वेळी उपरोक्त प्रकरणी समितीने विचारले की, बसमत तालुक्यातील राजवाडी पाझर तलावाचे माती कामामध्ये सन १९९७ मध्ये झालेल्या गैरव्यवहाराचे शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणावर अद्याप निर्णय न घेण्याची कारणे काय होती. त्यावर उपायुक्त, रोहयो, औरंगाबाद यांनी सांगितले की, राजेवाडी प्रकरणामध्ये दिनांक ८/१२/२०११ रोजी सर्व कागदपत्रे सादर करून चौकशी अधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल मागविण्यात आला. चौकशीमध्ये संबंधित अपचारी अधिकारी दोषमुक्त असल्याचा अहवाल देण्यात आला. परंतु विभागीय आयुक्तानी त्याबाबत असहमती दर्शविली आहे. त्याच्यावर दोषारोप सिध्द होत असल्यामुळे सविस्तर निवेदन सादर केले व ते पुढे पाठविले आहे. श्री. रायकर यांची तामील प्रत येणे आवश्यक आहे. ती आल्यानंतर ८ दिवसांत सर्व कागदपत्रे शासनाला सादर करण्यात येतील.

औंढा तालुक्यातील गांगलवाडी गांवतळयाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराच्या शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणावर कारवाई पूर्ण झाली आहे काय? असे विचारले असता, मुळ प्रशासकीय मान्यता किंमत रु.२.८० लक्ष दिनांक १६ मार्च, १९९२ व सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु १७.१७ लक्ष दिनाक २७ जून, २००३ आहे. काम पूर्ण झाले असून सदरील तलावात पाणी साठा झाला आहे. औंढा तालुक्यातील गांगलवाडी गाव तळयाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर कारवाई महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन आदेश क्रमांक १४११/प्र.क्र-४४/रोहयो-२, दिनांक १९ सप्टेबर, २०११ अन्वये श्री.एस.ओ.परदेशी, तत्कालीन कार्यकारी अभियंता (से.नि.), श्री.यु.व्ही पडगीलवार, तत्कालीन उ.वि.अ.(से.नि) व श्री.एस.एन.पत्तार तत्कालीन क.अ. यांना गैरव्यवहार प्रकरणी दोष मुक्त केले आहे असा खुलासा केला आहे.

● **अभिप्राय व शिफारशी :**

**गैरव्यवहाराची एकूण १७ प्रकरणे प्रलंबित असून काही प्रकरणे सन १९९३ पासूनची आहेत. ही प्रकरणे निम्नस्तरापासून शासनस्तरापर्यंत विविध स्तरावर निर्णयासाठी प्रलंबित आहेत. यामध्ये गेल्या १८-१९ वर्षात गैरव्यवहारात गुंतलेले अनेक संबंधित अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. शासनाच्या नवीन धोरणानुसार त्यांच्यावर जबाबदारी ठेवता येत असली तरी गैरव्यवहाराची प्रकरणे ठराविक कालावधी निर्णयाप्रत आली पाहिजेत अशी समितीने वारंवार शासनाला शिफारस केलेली आहे. मात्र गैरव्यवहारांच्या प्रकरणांच्या संदर्भात जिल्हाधिकारी, आयुक्त तसेच मंत्रालयीन विभागामध्ये समन्वयाचा अभाव असल्याने गैरव्यवहाराची प्रकरणे इतके वर्षे प्रलंबित राहिली आहेत त्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.**

**विविध स्तरावर प्रलंबित असलेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी, आयुक्त व शासनाने संबंधित यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून निश्चित काल मर्यादेत प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत व या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## ८. सामाजिक वनीकरण.—

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर, २०११ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील सामाजिक वनीकरणाच्या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, सन २००७-०८ आणि २००८-०९ या कालावधीत जिवंत झाडांची टक्केवारी खूपच कमी आहे. ही टक्केवारी कमी असण्याची कारणे काय आहेत? यावर उप वन संरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, हिंगोली यांनी सांगितले की, खाजगी पडीक जमिनीवर ही लागवडी केली जाते. समितीने पुढे विचारले की, यामध्ये गुंतलेली रक्कम किती आहे? खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवडीची योजना दर वर्षी घेतली जाते काय? त्यांना दरवर्षी पैसे दिले जातात काय? जिवंत झाडांची टक्केवारी

कमी येण्याची कारणे काय आहेत? हे प्रमाण कमी असले तरी पुढचे पैसे त्यांना दिले आहेत काय? उप वन संरक्षक यांनी सांगितले की, ही शेवटची टक्केवारी आहे.

पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी किती पैसे द्यावयाचे हे ठरविलेले आहे. वृक्ष लागवड केल्यानंतर ते जगले पाहिजे अशी सक्ती न करता त्यांना पैसे देण्यात आले होते काय शासनाच्या पैशाचा अपव्यय करण्याचे आपण ठरविले आहे काय? सन २००७-०८ मध्ये हिंगोली येथे जिवंत झाडांची टक्केवारी ३८.२५ टक्के, कळमनुरी १८.०२ टक्के, सेनगाव २४.२८ टक्के, बसमत आणि औंढा नागनाथ येथे शुन्य टक्के आहे. सन २००८-०९ साली हिंगोली येथे जिवंत झाडाची टक्केवारी २६.३३ टक्के, कळमनुरी येथे ३२.८२ टक्के, सेनगांव २४.०० टक्के, बसमत २६.०० टक्के, औंढा नागनाथ येथे ३१ टक्के आहे. आपण जी आकडेवारी दिलेली आहे त्यापेक्षा प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळीच असेल आपण फक्त पैसे वाटपाचे काम करीत आहात. जिवंत झाडाची टक्केवारी खूपच कमी आहे. प्रत्यक्षात जर मोजणी केली तर त्यापेक्षाही ही टक्केवारी वाढेल तेव्हा या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा असे समितीने स्पष्ट केले.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०११ रोजी हिंगोली येथे झालेल्या जिल्हा बैठकीत समितीला देण्यात आलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीनुसार दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सामाजिक वनीकरणार्गत करण्यात आलेली वृक्ष लागवडीतील जिवंत झाडांची टक्केवारी खूपच कमी असल्याने त्यासंदर्भात चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. यामध्ये जिवंत झाडांची टक्केवारी किती आहे ? तसेच या कार्यक्रमामध्ये एकूण किती रक्कम खर्च करण्यात आली आहे? त्यावर उप संचालक, सामाजिक वनीकरण, हिंगोली यांनी सांगितले की, सन २००७-०८ मध्ये ५३६ हेक्टर पैकी ४८ हेक्टरवर वृक्ष लागवड करण्यात आली. त्यासाठी २६.२२ लाख रुपये खर्च करण्यात आले. सन २००८-०९ मध्ये ५३६ हेक्टरमध्ये खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यापैकी ३६७ हेक्टर जमिनीवर वृक्ष लागवड करण्यात येवुन ६३ लाख रुपये खर्च करण्यात आले. यामध्ये ३६२ लाभार्थी होते. या कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांच्या १ हेक्टर आणि अर्धा हेक्टर खाजगी पडीक जमिनीवर लागवड करण्यात आली आहे.

या संपुर्ण योजनेचा राज्यस्तरावर आढावा घेतला आहे? असल्यास काय निदर्शनास आले आहे. असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी माहिती दिली की, खाजगी पडीक जमिनीवर पहिल्या वर्षी वृक्ष लागवड केल्यानंतर दुसऱ्या वर्षी झाडे जिवंत असतील तर दुसऱ्या वर्षी लागवड करतो आणि तिसऱ्या वर्षी समाधानकारक स्थिती असेल तर तिसऱ्या वर्षी लागवड करतो. यामध्ये मनुष्यबळ जास्त नसल्यामुळे इम्पेक्ट दिसत नाही.

खाजगी पडीक जमिनीवर शासनाने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला. त्यामध्ये १० टक्केसुध्दा यशस्वी झालेले नाही. याबाबत आपण अधिकृतपणे आढावा घेतला असेल तर त्यामध्ये किती टक्केवारी दिसून आली, त्याबाबत काही तक्रार आली आहे का? असे समितीने विचारले असता, याबाबत आतापर्यंत स्वतंत्रपणे मुल्यमापन झालेले नाही. असे विभागीय सचिव यांनी समितीला सांगितले.

या योजनेचे मुल्यमापन केले पाहिजे या योजनेवर शासनाचा गेल्या ८-१० वर्षात प्रचंड पैसा खर्च झाला आहे. परंतु त्याचा काहीही फायदा झाला नाही. शेतकऱ्यांना सुध्दा या योजनेबाबत फारसे गांभीर्य वाटत नाही. तर मग अधिकाऱ्यांना कसे वाटणार?असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आतापर्यंत ही योजना जवळपास बंद केली आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही योजना यापूर्वीच बंद करणे आवश्यक होते. त्यावर शासनाचे पैसे विनाकारण खर्च झाले आहे. गेल्या १० वर्षामध्ये या योजनेवरील शासनाचे पैसे वाया गेले याबाबत कुणावर जबाबदारी निश्चित करावयाची याबाबत मार्गदर्शन केले पाहिजे. जर ही योजना फायदेशीर ठरत नसेल तर ती थांबविली पाहिजे. याकरिता समितीला शासनाकडे शिफारस करावी लागेल. त्यावर जिल्हाधिकारी हिंगोली यांनी सांगितले की,समितीने ही योजना इम्प्रुव्हमेंट करण्याच्या दृष्टीने मौलिक सूचना व मार्गदर्शन केले आहे. त्याअनुषंगाने हिंगोली जिल्ह्यामध्ये कशी सुधारणा करता येईल याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करून समितीच्या सूचनांबाबत कार्यवाही करण्यात येईल असे समितीला सांगितले.

- अभिप्राय व शिफारशी :

**सामाजिक वनीकरणाअंतर्गत झाडांची लागवड केल्यानंतर लावलेली झाडे १०० टक्के कशी जिवंत राहतील याची काळजी घेतली पाहिजे व तशी व्यवस्था केली पाहिजे. या जिल्ह्यात वृक्ष लागवडीतील जिवंत झाडांची टक्केवारी खुपच कमी आहे. याबाबतीत संबंधित यंत्रणा गांर्भियाने घेत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले असल्यामुळे यासंदर्भात चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा.**

**या जिल्ह्यात सामाजिक वनीकरणार्गत करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीतील जिवंत झाडांची टक्केवारी खुपच कमी असल्याने शेतकऱ्यांना सुध्दा या योजनेबाबत फारसे गांभीर्य वाटत नाही. शासनाचा पैसा विनाकारण खर्च होत आहे. शासनाची ही योजना जर फायदेशीर ठरत नसेल तर या योजनेचा फेर आढावा घेऊन वृक्ष संवर्धन/संगोपनाच्या दृष्टीने निश्चित स्वरूपाचा आराखडा तयार करून त्याची काटकोरपणे अंमलबजावणी करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट एक
# अपूर्ण कामे

गोषवारा

## प्रश्न क्र 09- अपूर्ण कामे (मागील तिमाही अखेर)

### काम सरु झाल्यापासून अपूर्ण असलेल्या कामाची बाबतची माहिती

### 1 ते 5 वर्षे, 6 ते 10 वर्षे, व 10 वर्षापेक्षा जास्त कालावधीतील अपुर्ण कामाची माहिती गोषवारा

| अ.क्र. | यंत्रणा | अपूर्ण कामांची संख्या | | | | अपूर्ण असल्याची कारणे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1ते 5वर्षातील अपूर्ण कामं | 5ते 10 वर्षातील अपूर्ण कामे | 10 वर्षावरील अूपर्ण कामे | एकूण अपूर्ण कामे | वन जमिनी अभावी | भुसंपादना अभावी | सुधारीत अंदाजपत्रका अभावी | काळया माती अभाव | कोर्ट स्टे | इतर कारणा मुळे | प्रगती पथावर | जमीन वाद | भौतीक दृष्टया पुर्ण | एकूण |
| 1 | 2 | 3 | | | | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग हिंगोली. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| 2 | कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम हिंगोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| 3 | कार्यकारी अभियंता जि.प. ल.सिंचन हिंगोली | निरंक | निरंक | 3 | 3 | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 2 | निरंक | निरंक | 1 | 3 |
| 4 | कार्यकारी अभियंता ल.पा. राज्यस्तर परभणी | निरंक | निरंक | 16 | 16 | निरंक | निरंक | 8 | निरंक | निरंक | निरंक | 4 | निरंक | 4 | 16 |
| 5 | कार्यकारी अभियंता पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत | निरंक | निरंक | 3 | 3 | 1 | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 2 | 3 |
| 5 | कार्यकारी अभियंता ल.पा. स्थानीक स्तर नांदेड | निरंक | निरंक | 3 | 3 | निरंक | निरंक | 2 | निरंक | निरंक | निरंक | 1 | निरंक | निरंक | 3 |
| 6 | उपवन संरक्षक परभणी | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 0 | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 0 |
| 7 | उप संचालक सामाजिक वनीकरण परभणी | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 0 | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 0 |
| 8 | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंगोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 0 | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | 0 |
| | एकूण | निरंक | निरंक | 25 | 25 | 1 | 0 | 10 | 0 | 0 | 2 | 5 | निरंक | 7 | 25 |

प्रश्न क्र 09- अपूर्ण कामे (मागील तिमाही अखेर)

काम सरु झाल्यापासून अपूर्ण असलेल्या कामाची बाबतची माहिती

1 ते 5 वर्षे, 6 ते 10 वर्षे, व 10 वर्षापेक्षा जास्त कालावधीतील अपुर्ण कामाची माहिती गोषवारा

